भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा मार्च २०२४ रोजी संपलेल्या कालावधीसाठी जल जीवन अभियानावरील निष्पादन लेखापरीक्षा अहवाल....

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक, क्रमांक क. भानिम २०२६ / प्र.क्र. ६३ /लोलेस,**
**मंत्रालय, मुंबई- ४०००३२.**
**दिनांक १४ जुलै, २०२६.**

**परिपत्रक**

**संदर्भ :- शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक भानिम १२००/प्र.क्र.२०५ / लोलेस दि.१८ जानेवारी २००१.**

१. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा मार्च २०२४ रोजी संपलेल्या कालावधीसाठी जल जीवन अभियानावरील निष्पादन लेखापरीक्षा अहवाल. महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना दिनांक १० जुलै, २०२६ रोजी सादर करण्यात आला आहे. सदर अहवालाची एक प्रत PDF स्वरुपात या परिपत्रकासोबत आवश्यक त्या समयबद्ध कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.सदर अहवाल भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक कार्यालयाच्या https://cag.gov.in/ag/nagpur/en या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

२. संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना सूचीत करण्यात येते की,भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक याचां मार्च २०२४ रोजी संपलेल्या कालावधीसाठी जल जीवन अभियानावरील निष्पादन लेखापरीक्षा अहवालात त्यांच्या विभागाशी / कार्यासनांशी संबंधित मुद्यांसंदर्भात स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या प्रती , संबंधित विभागांच्या सचिवांच्या मान्यतेने तसेच प्रधान महालेखापाल कार्यालयाची संमती ( Vetting ) करुन घेऊन परस्पर लोक लेखा समिती कक्ष,विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई, यांच्याकडे पाठविण्यात याव्यात व त्याची एक प्रत या कार्यासनास अग्रेषित करावी. तदनंतर विभागातील संबंधीत कार्यासनांनी वरीलप्रमाणे कार्यवाही करुन स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांच्या प्रती या कार्यासनास सादर कराव्यात.सदर अहवाल प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या प्रती तीन महिन्यांच्या विहित मुदतीत लोक लेखा समितीस सादर करण्यात याव्यात.

३. लोक लेखा समितीच्या यापूर्वी झालेल्या साक्षींदरम्यान प्रशासकीय विभागांकडून स्पष्टीकरणात्मक ज्ञापने पाठविण्याबाबत होणारा विलंब आणि त्यामध्ये असलेल्या त्रुटी यांचा लोक लेखा समितीने गांभिर्यपूर्वक विचार केलेला आहे व त्याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. यास्तव या विभागाच्या संदर्भाधीन दिनांक १८ जानेवारी, २००१ च्या शासन परिपत्रकातील सूचनांचे कोटेकोरपणे पालन करावे, तसेच खालील सूचना प्रकर्षाने ध्यानात घ्याव्यात.

I स्पष्टीकरणात्मक ज्ञापने परिपूर्ण आणि स्वयंस्पष्ट असावीत. त्यामध्ये चूकीची माहिती दिलेली नसावी. स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या २० इंग्रजी प्रती व तसेच ४० मराठी प्रती लोक लेखा समिती, विधानमंडळ सचिवालयास पाठवाव्यात. तसेच त्या पत्राची व स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची प्रत्येकी १ प्रत लोलेस कार्यासन, वित्त विभाग यांचेकडे पाठवावी

II. उपरोक्त प्रयोजनासाठी विभाग प्रमुखांकडून/नियंत्रण अधिकाऱ्यांकडून काही माहिती मागविणे आवश्यक असेल तर ती माहिती "अत्यंत तातडीने पाठवावी" अशी त्यांना सूचना करावी.

III.या मध्ये क्षेत्रीय कार्यालयांकडून दिरंगाई झाल्यास त्याबाबतची वस्तुस्थिती संबंधित सचिवांच्या तात्काळ निदर्शनास आणावी.

IV. कोणत्याही परिस्थितीत स्पष्टीकरणात्मक ज्ञापने लोक लेखा समितीकडे पाठविण्याबाबत विलंब होता कामा नये, याची सर्व संबंधीत विभागांनी कटाक्षाने काळजी घ्यावी.

V. मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून लोक लेखा समितीला स्पष्टीकरणात्मक ज्ञापने फार विलंबाने प्राप्त होतात. याबाबत लोक लेखा समितीच्या अध्यक्षांनी शासनाकडे वेळोवेळी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे लोक लेखा समिती विषयक कामकाज गांभिर्याने व तत्परतेने हाताळण्यात यावे.

४. यासंदर्भात असेही निदर्शनास आणून देण्यात येते की, जर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांच्या सदर अहवालातील परिच्छेदांची स्पष्टीकरणात्मक ज्ञापने महालेखापालांच्या मान्यतेने लोक लेखा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ यांच्याकडे व त्याची एक प्रत वित्त विभागाकडे विहित मुदतीत पाठविण्यास संबंधितांकडून विलंब झाला, तर संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन आवश्यक ती कारवाई करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०७१४१५०९०००६०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAVIKUMAR BALAJIRAO LINGANWAD
Date: 2026.07.14 15:12:11 +05'30'

(रविकुमार लिंगनवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

**सोबत** :- अहवालाची प्रत PDF स्वरुपात.(online)

**प्रतिः**- सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव,
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मुंबई -३२
सर्व सह सचिव / उप सचिव वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**प्रत** :- माहितीसाठी:-
संचालक, लेखा व कोषागारे,मुंबई.
प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)- १, महाराष्ट्र मुंबई
प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १ महाराष्ट्र मुंबई
उप सचिव, लोक लेखा समिती कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

SUPREME AUDIT INSTITUTION OF INDIA
लोकहितार्थ सत्यनिष्ठा
Dedicated to Truth in Public Interest

# भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा मार्च 2024 रोजी संपलेल्या कालावधीसाठी जल जीवन अभियानावरील निष्पादन लेखापरीक्षा अहवाल

# Report of the Comptroller and Auditor General of India Performance Audit on Jal Jeevan Mission for the period ended March 2024

Marathi

English

## महाराष्ट्र शासन
## Government of Maharashtra

वर्ष 2026 चा अहवाल क्रमांक 2
Report No. 2 of 2026

(निष्पादन लेखापरीक्षण - नागरी)
(Performance Audit – Civil)

SUPREME AUDIT INSTITUTION OF INDIA

लोकहितार्थ सत्यनिष्ठा

Dedicated to Truth in Public Interest

# भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा मार्च 2024 रोजी संपलेल्या कालावधीसाठी जल जीवन अभियानावरील निष्पादन लेखापरीक्षा अहवाल

## महाराष्ट्र शासन

## वर्ष 2026 चा अहवाल क्रमांक 2

## (निष्पादन लेखापरीक्षण - नागरी)

# भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक
# यांचा मार्च 2024 रोजी संपलेल्या कालावधीसाठी
# जल जीवन अभियानावरील निष्पादन
# लेखापरीक्षा अहवाल

**महाराष्ट्र शासन**

**वर्ष 2026 चा अहवाल क्रमांक 2**

**(निष्पादन लेखापरीक्षण - नागरी)**

## अनुक्रमणिका

# उपोद्घात

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा हा अहवाल, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151 अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना सादर करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

या अहवालात एप्रिल 2019 ते मार्च 2024 या कालावधीतील 'जल जीवन अभियान' या निष्पादन लेखापरीक्षणाचे निष्कर्ष समाविष्ट आहेत. हे लेखापरीक्षण, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवाशर्ती) अधिनियम, 1971 आणि त्याअंतर्गत अधिसुचित केलेल्या लेखापरीक्षण व लेखे विनियम, 2007 (2020 सुधारित) च्या तरतुदींनुसार करण्यात आले आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी निर्गमित केलेल्या लेखापरीक्षण मानकांनुसार हे निष्पादन लेखापरीक्षण करण्यात आले आहे.

**टीप: मूळ इंग्रजी अहवालावरून अनुवादित: शंका समाधानासाठी कृपया इंग्रजी अहवाल पाहावा.**

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## जल जीवन अभियानाचे निष्पादन लेखापरीक्षण

### लेखापरीक्षण थोडक्यात

| आम्ही हे लेखापरीक्षण का केले? | आपल्याला काय आढळले? |
|---|---|
| ➢ कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये यशस्वीरित्या साध्य झाली आहेत,<br>➢ योजनेच्या नियोजन, अंमलबजावणी आणि कार्यान्वयनोत्तर व्यवस्थापनासाठी कार्यक्षम संस्थात्मक रचना अस्तित्वात होती,<br>➢ आर्थिक संसाधनांचा वापर काटकसरीने आणि कार्यक्षमतेने करण्यात आला आहे; आणि<br>➢ कार्यक्रमाद्वारे निर्माण केलेली मालमत्ता पुढील दोन ते तीन दशकांसाठी शाश्वत आहे आणि त्यामुळे भावी पिढ्यांच्या जलसुरक्षेला कोणताही धोका पोहोचत नाही. | राज्यातील 1.46 कोटी ग्रामीण कुटुंबांना कार्यान्वित घरगुती नळ जोडणी (एफएचटीसी) देण्याचे उद्दिष्ट असताना, मार्च 2024 पर्यंत 1.25 कोटी कुटुंबांना एफएचटीसी देण्यात आली. 2019-24 या वर्षात महाराष्ट्रातील पाणी पुरवठा योजनांची (डब्ल्युएसएस) प्रगती केवळ 24.64 *टक्के* होती, कारण राज्यात एकूण 51,560 डब्ल्युएसएस सुरू करण्यात आल्या होत्या, त्यापैकी 12,703 पूर्ण झाल्या होत्या आणि 75.35 *टक्के* (38,857) डब्ल्युएसएस प्रगतीपथावर होत्या. राज्यात जेजेएमच्या अंमलबजावणीसाठी सुरुवातीचा अंदाजित खर्च (सप्टेंबर 2020) ₹ 13,668.50 कोटी होता. तथापि, प्रत्येक कुटुंबाला एफएचटीसी देण्याचे उद्दिष्ट साध्य न करताच मार्च 2024 पर्यंत ₹ 26,410.51 कोटी खर्च झाले होते.<br>पायाभुत सर्वेक्षण न केल्याने झालेल्या कमकुवत नियोजनामुळे जेजेएमच्या अंमलबजावणीवर परिणाम झाला. आवश्यक मापदंडांचा समावेश न करता तयार करण्यात आलेला ग्राम कृती आराखडा सदोष होता. संपूर्ण योजनेच्या कालावधीसाठी जिल्हा कृती आराखडा तयार करण्यात आला नव्हता आणि खात्रीशीर जलस्रोतांशिवाय योजनांचे नियोजन करण्यात आले होते. |

| **आम्ही हे लेखापरीक्षण का केले?** | **आपल्याला काय आढळले?** |
|---|---|
| | अपुरे प्रारंभिक नियोजन, सदोष सर्वेक्षणे, अंमलबजावणीतील विलंब आणि योजनांमध्ये वारंवार होणारे बदल यांमुळे अंमलबजावणीचा खर्च वाढला. अतिरिक्त रहिवाशांसाठी कामाची व्याप्ती वाढणे, जलस्रोत/जमिनीत बदल, अतिरिक्त कामांची अंमलबजावणी, निविदा दरापेक्षा जास्त दराने काम देणे या कारणांमुळे राज्य स्तरावर 27 *टक्के* (51,560 पैकी 13,835) आणि निवडक जिल्हा स्तरावर 38 *टक्के* (7,730 पैकी 2,976) डब्ल्युएसएस, या दर बदलाच्या प्रक्रियेत होत्या, ज्यामुळे खर्चात ₹ 9,608.87 कोटींची वाढ झाली. |
| | उपयोगीता प्रमाणपत्रे आणि लेखापरीक्षित लेखे सादर करण्यास झालेल्या विलंबामुळे केंद्र आणि राज्य निधीचे वेळेत वितरण आणि वापर यावर प्रतिकूल परिणाम झाला. |
| | राज्य स्तरावर, 26.50 *टक्के* (40,297 पैकी 10,677) गावांना 'हर घर जल' म्हणून प्रमाणित करण्यात आले, तर निवडक जिल्हा स्तरावर 27.30 *टक्के* (8,005 पैकी 2,185) गावांना 'हर घर जल' म्हणून प्रमाणित करण्यात आले. |
| | पाणी गुणवत्ता तपासणीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा अपुऱ्या असल्याचे आढळून आले, कारण राज्य प्रयोगशाळा स्थापन झालेली नव्हती आणि उपविभागीय प्रयोगशाळांचे अधिमान्यता होणे बाकी होते. |
| | संचालन आणि देखभाल धोरण तयार केले गेले नव्हते. |
| | राज्यात, ₹ 2,043.79 कोटींच्या एकूण देय सामुदायिक योगदानापैकी, ₹ 21.72 कोटी |

| आम्ही हे लेखापरीक्षण का केले? | आपल्याला काय आढळले? |
|---|---|
| | (एक *टक्का*) रक्कम गोळा केली गेली (ऑक्टोबर 2024).<br>निवडक जिल्ह्यात आयएमआयएस मध्ये विसंगतीची प्रकरणे निदर्शनास आल्याने, जेजेएम-आयएमआयएस माहिती विश्वसनीय आणि अचूक नव्हती.<br>जिल्हा पाणी व स्वच्छता अभियानाच्या बैठका नियमितपणे आयोजित केल्या जात नव्हत्या. |
| प्रमुख आकडेवारी<br>**ऑगस्ट 2019 पर्यंत**<br>एकूण कुटुंबे: 138.54 लाख<br>एफएचटीसी व्याप्ती - 48.44 लाख<br>**मार्च 2024 पर्यंत**<br>एकूण कुटुंबे: 146.81 लाख<br>एफएचटीसी व्याप्ती: 125.01 लाख<br>पाणी पुरवठा योजना: (2019-24)<br>एकूण हाती घेतलेल्या पाणी पुरवठा योजना: 51,560<br>पूर्ण झालेल्या पाणी पुरवठा योजना: 12,703<br>हर घर जल असलेले तालुके: 351 पैकी 02 (0.56 टक्के)<br>हर घर जल प्रमाणपत्र असलेली गावे: 40,297 पैकी 10,677 (26.50 टक्के)<br>एकूण खर्च (2019-24): | ***आमची शिफारस काय आहे?***<br>***शासन पुढील गोष्टी करू शकते:***<br>➢ ***जेजेएम मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद केल्यानुसार, प्रभावी आणि कार्यक्षम ग्राम कृती आराखडा, जिल्हा कृती आराखडा आणि राज्य कृती आराखडयाद्वारे कामांचा स्पष्ट अंमलबजावणी पथनकाशा आणि संतुलित कार्यान्वयन प्रदान करावे.***<br>➢ ***पाण्याच्या खात्रीशीर स्रोतांची खात्री केल्यानंतरच डब्ल्युएसएस मंजूर केल्या जातील याची खात्री करावी.***<br>➢ ***जेजेएमअंतर्गत, खाजगी/स्वस्रोतावरून नळजोडणी असलेल्या सर्व घरांचे नियमित एफएचटीसीमध्ये रूपांतरण सुनिश्चित करणे.***<br>➢ ***केंद्र आणि राज्याच्या वाट्याचा निधी वेळेवर वितरित करण्यासाठी आणि त्याचा इष्टतम वापर सक्षम करण्यासाठी निधी वाटप नियोजन मजबूत करावे.***<br>➢ ***अखर्चीत रकमेवरील मिळणारे व्याज एकत्रित निधीमध्ये जमा करण्याची*** |

| आम्ही हे लेखापरीक्षण का केले? | आपल्याला काय आढळले? |
|---|---|
| ₹ 26,410.51 कोटी<br>अमान्य खर्च: ₹ 7.62 कोटी | *आणि उपयोगिता प्रमाणपत्रे (युसी) व लेखापरीक्षित लेखे सादर करण्याची कालमर्यादा सुनिश्चित करावी.*<br>➢ *अधिक चांगले अंतर्गत नियंत्रण आणि नियमित देखरेखीद्वारे अमान्य खर्च टाळण्यासाठी यंत्रणा तयार करावी.*<br>➢ *प्रत्येक घराला एफएचटीसी प्रदान करण्याची प्रक्रिया जलद करणे, तसेच प्रलंबित डब्ल्युएसएस पूर्ण करून त्यांना पूर्णपणे कार्यान्वित करणे आणि डब्ल्युएसएस मंजूर करण्यापूर्वी व प्रदान करण्यापूर्वी जमिनीची उपलब्धता आणि अनिवार्य परवानग्या सुनिश्चित कराव्या.*<br>➢ *अचूकता आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी देखरेख यंत्रणा बळकट करणे आणि एफएचटीसी माहितीची जुळवाजुळव करणे, तसेच, विशेषतः हर घर जल (एचजीजे) गावांचे प्रमाणीकरण, घरगुती जोडण्यांचे मीटरिंग आणि मालमत्ता संरक्षण या बाबतीत जेजेएम मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करावे.*<br>➢ *राज्य प्रयोगशाळेची लवकर स्थापना करून जल चाचणी सुविधा बळकट करण्याबरोबरच, जल गुणवत्ता चाचणी आणि अहवाल देण्याची प्रक्रिया अधिक मजबूत करावी.*<br>➢ *पाण्याच्या नमुन्यांच्या तपासणीची प्रक्रिया अधिक विश्वसनीय करण्यासाठी राज्यातील सर्व उपविभागीय प्रयोगशाळांना एनएबीएल मान्यता* |

| आम्ही हे लेखापरीक्षण का केले? | आपल्याला काय आढळले? |
|---|---|
| | *आणि अधिस्वीकृती देण्याचा विचार करावा.*<br>➢ *ओ&एम धोरणाची लवकरात लवकर निर्मिती आणि अंमलबजावणी सुनिश्चित करावी आणि डब्ल्युएसएसच्या कार्यक्षम संचालन आणि देखभाल (ओ&एम) साठी सामुदायिक योगदान गोळा करण्याकरिता एक प्रभावी यंत्रणा तयार करावी.*<br>➢ *प्रभावी देखभालीसाठी कुशल मनुष्यबळ विकसित करण्याकरिता एक यंत्रणा तयार करावी.*<br>➢ *सर्व भूजल-आधारित योजनांसाठी अंतिम टप्प्यातील पाण्याची सुरक्षा आणि कृत्रिम पुनर्भरण प्रणाली सुनिश्चित करावी.*<br>➢ *जेजेएम-आयएमआयएस माहितीची सत्यता सुनिश्चित करावी.*<br>➢ *डब्ल्युएसएसचे प्रभावी सनियंत्रण सुनिश्चित करण्यासाठी, सरकारने जिल्हा जल व स्वच्छता अभियानाच्या नियमित बैठका घेण्याचा, ग्रामपंचायतीचा समावेश असलेला त्रिपक्षीय करार करण्याचा, तसेच सेन्सर्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), सानुकूलित डॅशबोर्ड, स्काडा प्रणाली आणि डीएमए यांसारख्या माहिती तंत्रज्ञान साधनांचा अवलंब करण्याचा विचार करावा.* |

## कार्यकारी सारांश

जल जीवन अभियान (जेजेएम) हा भारत सरकारचा प्रमुख कार्यक्रम आहे, जो प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला कार्यान्वित नळजोडणी देण्यासाठी 15 ऑगस्ट 2019 रोजी सुरू करण्यात आला. राष्ट्रीय स्तरावर जलशक्ती मंत्रालय हे जेजेएमच्या सर्वांगीण धोरण, नियोजन, निधीपुरवठा आणि समन्वयासाठी नोडल मंत्रालय आहे. हा कार्यक्रम राज्य शासनाच्या भागीदारीने सुरू करण्यात आला आहे.

जेजेएमच्या सुरुवातीला (ऑगस्ट 2019) महाराष्ट्रात 138.54 लाख कुटुंबे होती, त्यापैकी 48.44 लाख कुटुंबांना नळजोडणी मिळाली होती. याचा खर्च भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन यांच्यात 50:50 या प्रमाणात समान विभागला जाणार होता.

जेजेएमच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, नळजोडणी तेव्हाच कार्यान्वित मानली जाते, जेव्हा ती दरडोई दररोज किमान 55 लिटर पाणी पुरवते, पाणी बीआयएस:10500 गुणवत्ता मानकांची पूर्तता करते आणि दीर्घकाळ अखंडित पाणी पुरवठा सुनिश्चित करते.

खालील बाबींचे मूल्यांकन करण्यासाठी, 2019-20 ते 2023-24 या कालावधीचे निष्पादन लेखापरीक्षण जुलै 2024 ते ऑक्टोबर 2024 या दरम्यान करण्यात आले, त्यात हे पाहीले गेले की:

- कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये यशस्वीरित्या साध्य झाली आहेत,
- योजनेच्या नियोजन, अंमलबजावणी आणि कार्यान्वयनोत्तर व्यवस्थापनासाठी कार्यक्षम संस्थात्मक रचना अस्तित्वात आहे,
- आर्थिक संसाधनांचा वापर काटकसरीने आणि कार्यक्षमतेने केला गेला आहे; आणि
- कार्यक्रमाद्वारे निर्माण केलेली मालमत्ता पुढील दोन ते तीन दशकांसाठी शाश्वत असून त्यामुळे भावी पिढ्यांच्या जलसुरक्षेला बाधा येणार नाही.

***जल जीवन अभियानाच्या नियोजनाची रचना***

लेखापरीक्षणात गाव, जिल्हा आणि राज्य स्तरावर जल जीवन अभियानाच्या नियोजन आणि अंमलबजावणीमध्ये प्रणालीगत त्रुटी आढळून आल्या. तपासणी केलेल्या कोणत्याही जिल्ह्यात पायाभूत सर्वेक्षण करण्यात आले नव्हते. निवडलेल्या सर्व 24 गावांनी ग्राम कृती आराखडा (व्हीएपी) तयार केला असला तरी, 13 गावांच्या बाबतीत, ग्राम कल्याण सेवा केंद्रांनी (व्हीडब्ल्युएससी) ग्रामपंचायतींकडून ठराव मंजूर करून न घेताच व्हीएपी तयार केला होता. जेजेएमच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार जिल्हा कृती आराखडा (डीएपी) तयार करण्यात

त्रुटी होत्या, कारण एफएचटीसी पुरवण्यासाठी त्रैमासिक आणि वार्षिक कृती आराखाडा, आर्थिक कृती आराखाडा, जल सुरक्षा, जमीन व मनुष्यबळाची आवश्यकता आणि जलस्रोत इत्यादी आवश्यक मापदंड डीएपीत समाविष्ट नव्हते. याचा परिणाम संसाधनांच्या आवश्यकतेचे मूल्यांकन आणि हाती घ्यावयाच्या कामाच्या प्रमाणावर झाला. राज्य स्तरावर, सर्वसमावेशक राज्य कृती आराखाडयाच्या अभावामुळे अंमलबजावणीत त्रुटी, कमकुवत संसाधन नियोजन आणि शाश्वततेवर अपुरे लक्ष केंद्रित झाले.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, पाणी पुरवठा वाढवण्यासाठी 13 डब्ल्युएसएस मंजूर करण्यात आल्या होत्या, परंतु जलस्रोताची खात्री न केल्यामुळे डब्ल्युएसएस पूर्ण होण्यास विलंब झाला. जलशुद्धीकरण प्रकल्पाची तरतूद न करता दोन डब्ल्युएसएस मंजूर करण्यात आल्या, ज्यामुळे पिण्यायोग्य नसलेल्या पाण्याचा पुरवठा झाला.

राज्य पातळीवर, जेजेएम अंतर्गत 27.74 लाख खाजगी नळजोडण्या समाविष्ट असल्याचे दाखवण्यात आले. निवडक सहा जिल्ह्यांमध्ये, जेजेएम डॅशबोर्डवर 37.89 लाख नळजोडण्या दाखवण्यात आल्या, ज्यात खाजगी/स्वस्रोतांच्या 9.64 लाख नळजोडण्यांचा समावेश होता, ज्या अद्याप जेजेएम अंतर्गत समाविष्ट व्हायच्या होत्या. खाजगी/स्वस्रोतांच्या नळजोडण्यांमुळे कार्यक्षमतेची खात्री मिळत नाही आणि म्हणूनच जेजेएम अंतर्गत एफएचटीसी प्रदान करण्याचे लक्ष म्हणून त्यांची गणना केली जाऊ शकत नाही.

***शिफारसी:***

- ***शासनाने जेजेएम मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद केल्यानुसार, कामांचा स्पष्ट अंमलबजावणी पथनकाशा आणि कामाचे शिल्लक कार्यान्वयन प्रभावी आणि कार्यक्षम व्हीएपी, डीएपी आणि एसएपीद्वारे प्रदान करावे.***
- ***शासनाने खात्रीशीर जलस्रोतांची खात्री केल्यानंतरच डब्ल्युएसएस मंजूर केल्या जातील हे सुनिश्चित करावे.***
- ***शासनाने जेजेएम अंतर्गत खाजगी/स्वस्रोतांवरून नळजोडणी असलेल्या सर्व घरांचे नियमित एफएचटीसीमध्ये रूपांतर केले जाईल हे सुनिश्चित करावे.***

***आर्थिक व्यवस्थापन***

निधी वितरणात (केंद्र/राज्य) विलंब झाला. पाचही वर्षांमध्ये, महाराष्ट्राला ₹ 59,740.99 कोटी देय होते, परंतु एकूण वितरित निधी (केंद्र आणि राज्य, सर्व टप्पे) केवळ ₹ 27,657.56 कोटी (46.30 *टक्के*) होता. 2019-24 या

कालावधीत राज्यात जेजेएमच्या अंमलबजावणीवर एकूण खर्च ₹ 26,410.51 कोटी होता. उपयोगिता प्रमाणपत्रे आणि लेखापरीक्षित लेखे सादर करण्यास झालेल्या विलंबामुळे, मंजुर निधीच्या तुलनेत निधी वितरणावर परिणाम झाला.

राज्यात जेजेएमच्या अंमलबजावणीचा सुरुवातीचा अंदाजित (सप्टेंबर 2020) खर्च ₹ 13,668.50 कोटी होता. अतिरिक्त रहिवाशांसाठी कामाची व्याप्ती वाढणे, पाण्याच्या स्रोतात/जमिनीत बदल, अतिरिक्त कामांची अंमलबजावणी, निविदा दरापेक्षा जास्त दराने काम देणे या कारणांमुळे राज्य स्तरावर 27 *टक्के* (51,560 पैकी 13,835) आणि निवडक जिल्ह्यांच्या स्तरावर 38 *टक्के* (7,730 पैकी 2,976) डब्ल्युएसएस, या दर बदलाच्या प्रक्रियेत होत्या, ज्यामुळे खर्चात ₹ 9,608.87 कोटींची वाढ झाली.

2020-21 ते 2023-24 या वर्षांदरम्यान केंद्र आणि राज्याला मिळालेले ₹ 220 कोटीचे व्याज एकत्रित निधीमध्ये जमा करण्यास विलंब झाला. जेजेएमच्या कोणत्याही उद्दिष्टाशी संबंधित नसलेल्या सॉफ्टवेअरची खरेदी, कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांचे बांधकाम, वीज बिलांचे पेमेंट यांसारख्या अमान्य खर्चाची उदाहरणेही निदर्शनास आली.

यावरून कमकुवत आर्थिक नियंत्रण आणि जेजेएमच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न झाल्याचे दिसून आले.

***शिफारसी:***

- ***केंद्र आणि राज्याच्या वाट्याची रक्कम वेळेवर वितरित करण्यासाठी आणि तिचा इष्टतम वापर सुनिश्चित करण्यासाठी शासनाने निधी वाटप नियोजन अधिक मजबूत करावे.***
- ***शासनाने न वापरलेल्या शिल्लक रकमेवरील मिळालेले व्याज एकत्रित निधीमध्ये जमा करण्याची आणि उपयोगिता प्रमाणपत्रे व लेखापरीक्षित लेखे सादर करण्याची कालमर्यादा सुनिश्चित करावी.***
- ***शासनाने अधिक चांगले अंतर्गत नियंत्रण आणि नियमित देखरेखीद्वारे अमान्य खर्च टाळण्यासाठी एक यंत्रणा तयार करावी.***

***जल जीवन अभियानाची अंमलबजावणी***

राज्यातील 34 जिल्ह्यांमध्ये एफएचटीसी द्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी पाणी पुरवठा योजना हाती घेऊन जेजेएमची अंमलबजावणी केली गेली. जेजेएमच्या सुरुवातीला (ऑगस्ट 2019) महाराष्ट्रात 138.54 लाख कुटुंबे होती, त्यापैकी

48.44 लाख कुटुंबांना नळजोडणी मिळाली होती. मार्च 2024 पर्यंत एफएचटीसी प्रदान करण्याचे उद्‌दिष्ट 85.15 *टक्के* होते, ज्यामध्ये खाजगी/स्वतःच्या स्रोताकडून नळजोडणी मिळालेल्या (27.74 लाख) कुटुंबांचा समावेश होता, जी जेजेएम अंतर्गत समाविष्ट व्हावयाची होती. अशाप्रकारे, जेजेएमअंतर्गत नळजोडणी विचारात घेतल्यास, डिसेंबर 2024 पर्यंत हे उद्‌दिष्ट 101.31 लाख म्हणजेच 69 *टक्के* होते. निवडक सहा जिल्ह्यांमध्ये, मार्च 2024 पर्यंत एफएचटीसी प्रदान करण्याचे उद्‌दिष्ट 22.45 लाख (82.72 *टक्के*) होते. 22.45 लाख नळजोडण्यांपैकी, 10.43 लाख नळजोडण्या खाजगी/स्वतःच्या स्रोताकडून होत्या. जेजेएम अंतर्गत दिलेल्या 12.02 लाख घरगुती नळजोडण्यांचा विचार करता, ही कामगिरी 44.29 *टक्के* होती. पुढे, लेखापरीक्षणात असे आढळून आले की, राज्यात जेजेएम अंतर्गत एफएचटीसी देण्यासाठी डीएपीतून 1,08,000 कुटुंबे वगळण्यात आली होती.

राज्यात 2019-24 दरम्यान एकूण 51,560 डब्ल्युएसएस सुरू करण्यात आल्या, त्यापैकी 24.64 *टक्के* (12,703) पूर्ण झाल्या आणि 75.30 *टक्के* (38,857) डब्ल्युएसएस प्रगतीपथावर होत्या. निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये डब्ल्युएसएसची प्रगती 16.57 *टक्के* होती. सर्व तपासलेल्या जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद (झेड्पी) आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एमजेपी) या दोन्हींद्‌वारे पाणी पुरवठा योजनांची पूर्णत्वातील कमी ही अंमलबजावणीतील अडचण दर्शवते आणि नियोजन व अंमलबजावणी क्षमतेमधील तफावतीकडे लक्ष वेधते, ज्यामुळे अभियानाची उद्‌दिष्ट्ये वेळेत साध्य होण्यावर प्रतीकुल परिणाम होत आहे. डब्ल्युएसएस पूर्ण होण्यास झालेला विलंब हा प्रामुख्याने कामाच्या सुरुवातीस झालेला विलंब, पाणी पुरवठा योजनेच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आवश्यक जमिनीची अनुपलब्धता, वन विभागाकडून वनजमिनीची मंजुरी न मिळणे, विविध प्राधिकरणांकडून ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) मिळण्यास झालेला विलंब इत्यादी कारणांमुळे होता. पुरवठा केलेल्या पाण्याचे प्रमाण मोजण्यासाठी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नव्हती आणि त्यामुळे लेखापरीक्षणाद्‌वारे पाण्याची पर्याप्तता म्हणजेच दरडोई दररोज किमान 55 लिटर (एलपीसीडी) पाण्याची उपलब्धता निश्चीत करता आली नाही.

राज्य स्तरावर, 26.50 *टक्के* (40,297 पैकी 10,677) गावांना 'हर घर जल' (एचजीजे) म्हणून प्रमाणित करण्यात आले, तर निवडक जिल्हा स्तरावर 27.30 *टक्के* (8,005 पैकी 2,185) गावांना एचजीजे म्हणून प्रमाणित करण्यात आले. एसडब्ल्युएसएम आणि जिल्हा अंमलबजावणी संस्थांमधील एफएचटीसी माहितीमधील तफावत, 'हर घर जल' गावांचे चुकीचे प्रमाणीकरण आणि मालमत्तांच्या जिओ-टॅगिंगमधील पुनरावृत्तीमुळे अहवालाच्या विश्वासार्हतेशी

तडजोड झाली. प्रत्येक घराला पाणी पुरवठा झाला नसतानाही गावांना एचजीजे गाव म्हणून घोषित करण्यात आले. एसएलएसएससी च्या पूर्वपरवानगीशिवाय कार्यादेश निर्गमित करणे, कंत्राटदारांच्या बोली क्षमतेचे चुकीचे मूल्यांकन, डब्ल्युएसएसचा विमा काढण्यातील अनियमितता, अतिरिक्त कामगिरी सुरक्षा रकमेची अपुरी प्राप्ती यांसारख्या कराराच्या अटींचे उल्लंघन देखील निदर्शनास आले.

***शिफारसी:***

- ***शासनाने प्रलंबित डब्ल्युएसएस पूर्ण कराव्या आणि प्रत्येक घराला एफएचटीसी देण्याची प्रक्रिया जलद करुन, एफएचटीसी पूर्णपणे कार्यान्वित करावे. तसेच डब्ल्युएसएस मंजूर व प्रदान करण्यापूर्वी जमिनीची उपलब्धता आणि अनिवार्य परवानग्या सुनिश्चित कराव्यात.***
- ***शासनाने अचूकता आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी देखरेख प्रणाली मजबूत करावी व एफएचटीसी डेटाची जुळवाजुळव करावी आणि विशेषतः एचजीजे गावांचे प्रमाणीकरण, घरगुती जोडण्यांचे मीटरिंग आणि मालमत्ता संरक्षण या बाबतीत जेजेएम मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करावे.***

***पाण्याच्या गुणवत्तेचे सनियंत्रण आणि देखरेख***

शासनाने सर्व स्रोतांमधून नियमितपणे पाण्याची चाचणी करणे सुनिश्चित केले नाही. निवडलेल्या सहा जिल्ह्यांपैकी पाच जिल्ह्यांमध्ये जलस्रोतांच्या चाचणीमध्ये लक्षणीय कमतरता होती. लेखापरीक्षणामध्ये असे आढळून आले की, निवडलेल्या चार गावांमध्ये जल गुणवत्ता व्यवस्थापन माहिती प्रणाली (ड्ब्ल्युक्युएमआयएस) माहितीमध्ये चाचणीसाठी प्राप्त झालेल्या नमुन्यांच्या संख्येपेक्षा केलेल्या चाचण्यांची संख्या जास्त दाखवण्यात आली होती. लेखापरीक्षणामध्ये असे दिसून आले की, अहिल्यानगरमध्ये, तालुक्यांमधून प्राप्त झालेले 301 पाण्याचे नमुने जिल्हा प्रयोगशाळांमध्ये तपासले गेले नाहीत. त्याचप्रमाणे, जळगाव जिल्ह्यात, 577 पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत प्राप्त झाल्यानंतरही तपासले गेले नाहीत.

राज्य प्रयोगशाळा स्थापन न झाल्यामुळे पाणी गुणवत्ता तपासणीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा अपुऱ्या असल्याचे आढळून आले. शिवाय, लेखापरीक्षणात असे दिसून आले की, सहा प्रादेशिक आणि 28 जिल्हा प्रयोगशाळांना एनएबीएल कडून मान्यता मिळाली होती, तर राज्यातील 143 उपविभागीय प्रयोगशाळांना अद्याप मान्यता मिळालेली नव्हती.

***शिफारसी:***

- ***शासनाने राज्य प्रयोगशाळेची लवकरात लवकर स्थापना करून पाणी तपासणी सुविधा बळकट करण्याबरोबरच, पाणी गुणवत्ता तपासणी आणि अहवाल देण्याची प्रक्रिया अधिक मजबूत करावी.***
- ***पाण्याच्या नमुन्यांच्या तपासणीची प्रक्रिया अधिक विश्वसनीय करण्यासाठी, शासनाने राज्यातील सर्व उपविभागीय प्रयोगशाळांना एनएबीएलची मान्यता आणि अधिस्वीकृती देण्याचा विचार करावा.***

***कार्यान्वयनोत्तर व्यवस्थापन आणि सनियंत्रण***

राज्यात कोणतेही संचालन आणि देखभाल धोरण तयार केले गेले नव्हते किंवा अस्तित्वात नव्हते, ज्यामुळे निर्माण केलेल्या पायाभूत सुविधांची देखभाल आणि योजनांच्या संचालनावर प्रतिकूल परिणाम होईल. शिवाय, ₹ 2,043.79 कोटींच्या एकूण देय सामुदायिक योगदानापैकी, ₹ 21.72 कोटी म्हणजेच केवळ एक *टक्का* रक्कम गोळा झाली. तसेच, निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये, ₹ 919.80 कोटींच्या देय सामुदायिक योगदानापैकी, केवळ ₹ 3.72 कोटी म्हणजेच 0.4 *टक्के* रक्कम गोळा झाली. सर्व जिल्ह्यांमधील संघटन पातळीची नगण्यता ही सामुदायिक सहभाग यंत्रणेतील कमतरता दर्शवते आणि जेजेएम अंतर्गत अपेक्षित शाश्वतता व मालकीच्या उद्दिष्टांना कमी लेखते.

शिवाय, प्रत्येक जिल्ह्यातून नल जल मित्र ओळखण्यासाठी नामांकने केवळ ऑक्टोबर 2024 मध्ये मागवण्यात आली होती आणि डब्ल्युएसएसच्या प्रभावी देखभालीसाठी कुशल मनुष्यबळाची ओळख आणि प्रशिक्षणाची पुढील प्रक्रिया राज्यात अद्याप सुरू व्हायची होती.

निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये 1,730 सौर ऊर्जा आधारित डब्ल्युएसएस हाती घेण्यात आल्या होत्या. लेखापरीक्षणात असे आढळून आले की, यापैकी केवळ 25 *टक्के* डब्ल्युएसएसची स्थापना पूर्ण झाली होती. शिवाय, निवड केलेल्या भूजल आधारित डब्ल्युएसएस असलेल्या कोणत्याही गावात स्रोताची शाश्वतता सुनिश्चित करणारी बोअरवेल पुनर्भरण संरचना प्रस्तावित करण्यात आली नव्हती.

जेजेएम-आयएमआयएस माहिती विश्वसनीय आणि अचूक नव्हती. याव्यतिरिक्त, निवडलेल्या सहापैकी पाच जिल्ह्यांमध्ये, जिल्हा जल व स्वच्छता अभियानाच्या मीटिंग्जमध्ये (डीडब्ल्युएसएम) 62 *टक्क्यांपासून* ते 78 *टक्क्यांपर्यंत* कमतरता होती. निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये, जल पायाभूत सुविधांच्या देखरेखीसाठी सेन्सर्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), कस्टमाइज्ड डॅशबोर्ड्स, स्काडा प्रणाली आणि जिल्हा मीटरिंग क्षेत्र (डीएमए) यांसारखी आयटी साधने एकतर स्वीकारली

गेली नव्हती किंवा त्यांची अंमलबजावणी अंशतः झाली होती. ग्रामपंचायत, अंमलबजावणी संस्था आणि कंत्राटदार यांच्यात डब्ल्युएसएस साठीचा त्रिपक्षीय करार झाला नव्हता, त्यामुळे पाणी डब्ल्युएसएसच्या अंमलबजावणीच्या प्रक्रियेत ग्रामपंचायती/व्हीडब्ल्युएससी सहभागी झाल्या नव्हत्या.

***शिफारसी:***

- ***शासनाने लवकरात लवकर संचालन आणि देखभाली (ओ&एम) धोरणाची निर्मिती व अंमलबजावणी सुनिश्चित करावी आणि डब्ल्युएसएसच्या कार्यक्षम ओ&एम साठी सामुदायिक योगदान गोळा करण्याकरिता एक प्रभावी यंत्रणा तयार करावी.***
- ***शासनाने प्रभावी देखभालीसाठी कुशल मनुष्यबळाच्या विकासाकरिता एक यंत्रणा तयार करावी.***
- ***शासनाने सर्व भूजल-आधारित योजनांसाठी अंतिम टप्प्यातील पाण्याची सुरक्षा आणि कृत्रिम पुनर्भरण प्रणाली सुनिश्चित करावी. शासनाने जेजेएम-आयएमआयएस वरील माहितीची सत्यता सुनिश्चित करावी.***
- ***डब्ल्युएसएसचे प्रभावी निरीक्षण सुनिश्चित करण्यासाठी, शासनाने जिल्हा जल व स्वच्छता अभियानाच्या नियमित बैठका घेणे, ग्रामपंचायतीचा समावेश असलेला त्रिपक्षीय करार करणे, तसेच सेन्सर्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), गरजेनुसार डॅशबोर्ड, स्काडा प्रणाली यांसारखी माहिती तंत्रज्ञानाची साधने आणि जिल्हा मीटरिंग क्षेत्र (डीएमए) यांसारख्या यंत्रणांचा अवलंब करण्याचा विचार करावा.***

# प्रकरण - I

# प्रस्तावना

# पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

# जल जीवन अभियानावरील निष्पादन लेखापरीक्षण

## प्रकरण I

### 1.1 प्रस्तावना

स्वातंत्र्यापासून, भारत सरकारने ग्रामीण जनतेला सुरक्षित पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी विविध कार्यक्रम हाती घेतले आहेत. 2009 मध्ये, भारत सरकारने पूर्वीच्या कार्यक्रमांमध्ये सुधारणा करून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (एनआरडीडब्ल्युपी) सुरू केला. या कार्यक्रमात पंचायत राज संस्था (पीआरआय) आणि सामुदायिक संघटनांचा समावेश असलेला विकेंद्रित दृष्टिकोन स्वीकारून, पिण्यायोग्यता, पर्याप्तता, सोय, परवडणारी किंमत आणि समानता या बाबतीत पाण्याची उपलब्धता शाश्वतपणे टिकवून ठेवण्यावर प्रमुख भर देण्यात आला.

11.24 कोटी लोकसंख्या (जनगणना 2011) आणि 3.08 लाख चौरस किलोमीटर भौगोलिक क्षेत्रफळ असलेले महाराष्ट्र, लोकसंख्येनुसार दुसऱ्या आणि क्षेत्रफळानुसार तिसऱ्या क्रमांकावर आहे. राज्यातील ग्रामीण भाग पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भूजलावर अवलंबून आहे, कारण जवळपास 80 *टक्के* जलस्रोत भूजलावर अवलंबून आहेत. महाराष्ट्राची 54.77 *टक्के* लोकसंख्या ग्रामीण असून, ऑगस्ट 2019 पर्यंत यापैकी 34.96 *टक्के* घरांमध्ये नळजोडणी होती.

### 1.2 जल जीवन अभियानाची उद्दिष्ट्ये

जल जीवन अभियान (जेजेएम) हा भारत सरकारचा प्रमुख कार्यक्रम आहे, जो 15 ऑगस्ट 2019 रोजी सुरू करण्यात आला. राष्ट्रीय स्तरावर जलशक्ती मंत्रालय हे जेजेएमच्या सर्वांगीण धोरण, नियोजन, निधीपुरवठा आणि समन्वयासाठी नोडल मंत्रालय आहे. हा कार्यक्रम राज्य शासनाच्या भागीदारीने सुरू करण्यात आला आहे.

या योजनेचे उद्दिष्ट 2024 च्या अखेरपर्यंत देशातील 19 कोटी ग्रामीण कुटुंबांना एफएचटीसी द्वारे पिण्यायोग्य नळपाणी पुरवठा करणे हे होते. जेजेएम अंमलबजावणीच्या कार्यान्वयन मार्गदर्शक तत्त्वांनुसार (2019), पाणीपुरवठ्याच्या बाबतीत कार्यान्वित नळजोडणीमध्ये तीन निश्चित वैशिष्ट्ये, म्हणजेच पुरेशा प्रमाणात (दरडोई दररोज किमान 55 लिटर), विहित गुणवत्तेचा (बीआयएस: 10500) आणि नियमितपणे अखंडित पाणी पुरवठा हे आहेत.

महाराष्ट्र शासनाने (जीओएम) दिनांक 04 सप्टेंबर 2020 रोजीच्या शासन निर्णयाद्वारे राज्यात जेजेएमच्या अंमलबजावणीस मान्यता दिली. एनआरडीडब्ल्युपी अंतर्गत सुरू असलेले कार्यक्रम देखील जेजेएममध्ये विलीन करण्यात आले.

## 1.3 योजनेची भौतिक प्रगती

2019-2024 या कालावधीत, महाराष्ट्र शासनाने जेजेएम अंतर्गत एकूण 51,560 पाणी पुरवठा योजना (डब्ल्युएसएस) हाती घेतल्या. जेजेएमची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी या डब्ल्युएसएस 2024 पर्यंत पूर्ण करायच्या होत्या. मार्च 2024 पर्यंत, 12,703 डब्ल्युएसएस पूर्ण झाल्या होत्या आणि 38,857 योजना प्रगतीपथावर होत्य. त्याचप्रमाणे, राज्यातील 1.46 कोटी ग्रामीण कुटुंबांना एफएचटीसी देण्याचे उद्दिष्ट असताना, मार्च 2024 पर्यंत 1.25 कोटी कुटुंबांना एफएचटीसी पुरवण्यात आले.

## 1.4 राज्यात जेजेएमच्या अंमलबजावणीसाठीची संघटनात्मक रचना

योजनेच्या अंमलबजावणीसाठी, खालील तपशिलानुसार चार-स्तरीय संस्थात्मक यंत्रणा उभारण्यात आली आहे:

**राष्ट्रीय स्तरावर,** राष्ट्रीय जल जीवन अभियानाची स्थापना करण्यात आली आहे, ज्याचे प्रमुख अभियान संचालक असतात. ते जेजेएमच्या सर्वांगीण अंमलबजावणीसाठी जबाबदार असून, सहभागी राज्यांना धोरणात्मक मार्गदर्शन, आर्थिक सहाय्य आणि तांत्रिक सहाय्य पुरवतात.

**राज्य स्तरावर,** राज्य पाणी व स्वच्छता अभियान (एसडब्ल्युएसएम) असून, त्याची निर्णायक मंडळ (सर्वोच्च समिती) आणि कार्यकारी समिती जेजेएमच्या सर्वांगीण नियोजन, अंमलबजावणी आणि नियंत्रणासाठी जबाबदार आहेत.

**जिल्हा स्तरावर,** जिल्हा पाणी व स्वच्छता अभियान (डीडब्ल्युएसएम) जेजेएमच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार आहे.

**ग्राम स्तरावर,** ग्राम पाणी व स्वच्छता समिती (व्हीडब्ल्युएससी), ग्रामपंचायत (ग्रा.प.) किंवा तिच्या उपसमितीमार्फत, ग्राम कृती आराखडा तयार करणे आणि गावांतर्गत पाणी पुरवठा योजनांचे नियोजन, रचना, अंमलबजावणी, संचालन व देखभाल करण्यासाठी जबाबदार आहे. गावाचा ग्रामसेवक हा व्हीडब्ल्युएससी सदस्य सचिव असतो.

राज्यात एक राज्यस्तरीय योजना मंजुरी समिती (एसएलएसएससी) देखील आहे, जी मूलतः जेजेएमसाठी राज्यस्तरीय तांत्रिक समिती म्हणून काम करते.

एसएलएसएससीचे अध्यक्ष पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाचे (डब्ल्युएसएसडी) प्रधान सचिव असतात. एसएलएसएससी अशा योजनांच्या मंजुरीसाठी, ज्या डीडब्ल्युएसएमच्या अखत्यारीत येत नाहीत, उदा., आंतरीक/आंतर-जिल्हा वितरण जाळे, प्रादेशिक जलपुरवठा योजना, प्रक्रिया प्रकल्प इत्यादी, बैठका आयोजित करते.

**राज्यातील अंमलबजावणी संस्थांची भूमिका**

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एमजेपी):** ही डब्ल्युएसएसडी अंतर्गत एक स्वायत्त संस्था आहे. राज्य स्तरावर सदस्य सचिव हे कार्यकारी प्रमुख असतात आणि विभागीय स्तरावर कार्यकारी अभियंता (कार्य.अभि.) हे प्रमुख असतात. पाच कोटी रुपयांपेक्षा जास्त अंदाजित खर्च असलेल्या पाणी पुरवठा योजना आणि बहु-ग्रामीण योजनांची अंमलबजावणी एमजेपीद्वारे केली जाते.


**जिल्हा परिषद:** ही ग्रामीण विकास आणि पंचायत राज विभागाच्या (आरडीपीडी) अंतर्गत काम करते. जिल्हा परिषदेचे (झेडपी) मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) हे डीडब्ल्युएसएमचे सह-अध्यक्ष असतात. कार्य.अभि., ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, (आरडब्ल्युएसडी) जिल्हा परिषद हे पाच कोटी पर्यंत अंदाजित खर्च असलेल्या पाणी पुरवठा योजनांच्या संपूर्ण अंमलबजावणीची देखरेख करतात.

**भूजल सर्वेक्षण आणि विकास संस्था (जीएसडीए):** ही संस्था संचालनालयाच्या अखत्यारीत असून, विविध योजनांच्या माध्यमातून राज्यातील भूजल संसाधनांचा विकास आणि व्यवस्थापन करण्याचे काम करते. समाजाला सुरक्षित आणि पिण्यायोग्य पाणी पुरविणे हे तिचे मुख्य उद्दिष्ट आहे.

अंमलबजावणी संस्था (आयए) या गावातील पायाभूत सुविधांसाठी आराखडा, अंदाजपत्रक तयार करणे आणि तांत्रिक मंजुरी देणे यांसारख्या कामांसाठी व्हीएपी तयार करण्याकरिता गाव समुदायाला तांत्रिक मदत पुरवण्यासाठी देखील जबाबदार आहेत.

राज्यात जेजेएमच्या अंमलबजावणीसाठीची संघटनात्मक रचना **तक्ता 1** मध्ये दिली आहे:

**तक्ता 1: जेजेएमचा ऑर्गनोग्राम**




*स्रोत: विभागाची कागदपत्रे*

## 1.5 वित्तीय व्यवस्थापन

राष्ट्रीय स्तरावर या अभियानाचा अंदाजित खर्च (2019) ₹ 3.60 लाख कोटी होता, ज्यामध्ये केंद्र आणि राज्यांचा वाटा अनुक्रमे ₹ 2.08 लाख कोटी आणि ₹ 1.52 लाख कोटी होता.

महाराष्ट्र शासनाने (सप्टेंबर 2020) राज्यात जेजेएमच्या अंमलबजावणीसाठी ₹ 13,668.50 कोटींचा अंदाज वर्तवला आहे. जेजेएम निधीच्या उप-घटकांमध्ये व्याप्ती निधी, सहाय्यक उपक्रम आणि जल गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली (डब्ल्युक्युएमएस) यांचा समावेश आहे. राज्याला वाटप केलेल्या निधीपैकी पाच *टक्क्यांपर्यंत* आणि दोन *टक्क्यांपर्यंतचा* निधी अनुक्रमे सहाय्यक उपक्रमांसाठी आणि जल गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीच्या उपक्रमांसाठी वापरला जाईल. घटकनिहाय केंद्र-राज्य निधी वितरणाचा नमुना खालील **तक्ता 1** मध्ये दर्शविला आहे:

**तक्ता 1: जेजेएम निधीचे घटक**


| घटक | केंद्र/राज्य निधी गुणोत्तर | खर्च |
|---|---|---|
| व्याप्ती निधी | 50:50 | घरघुती नळजोडणी देण्यासाठी पाणी पुरवठा योजनांचे बांधकाम करणे. |

| घटक | केंद्र/राज्य निधी गुणोत्तर | खर्च |
|---|---|---|
| सहाय्यक उपक्रम | 60:40 | स्थानिक समुदायांमध्ये माहिती, शिक्षण आणि संवाद; मानवी संसाधन विकास; प्रशिक्षण आणि कौशल्य विकास; स्थानिक समुदायांचे संघटन; त्रयस्थ पक्ष तपासणी; बदल व्यवस्थापन; संसाधन केंद्रे; ज्ञान केंद्र; कार्यशाळा, आढावा बैठका, जेजेएमवरती अभ्यास दौरे; एकात्मक व्यवस्थापन माहीती प्रणाली (आयएमआयएस) |
| पाण्याच्या गुणवत्तेचे निरीक्षण आणि देखरेख | 60:40 | पाण्याच्या गुणवत्तेची चाचणी, प्रयोगशाळा इत्यादी संबंधित बाबी. |

सोसायटी नोंदणी अधिनियम, 1860 अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या एसडब्ल्युएसएम या संस्थेने, एचडीएफसी बँक, ठाणे येथे 'एस्क्रो खाते' म्हणून एकल नोडल खाते (एसएनए) कार्यान्वित केले आहे. जेजेएम निधीमधील केंद्र आणि राज्याचा वाटा थेट या एसएनए मध्ये जमा केला जातो.

2019-20 ते 2023-24 या कालावधीत, महाराष्ट्रात जेजेएमच्या अंमलबजावणीसाठी वाटप केलेला एकूण निधी (केंद्र आणि राज्याचा वाटा) ₹ 27,559.26 कोटी होता. जेजेएम निधीमधील केंद्र आणि राज्याच्या वाट्याचा वर्षनिहाय तपशील **तक्ता 2** मध्ये दिला आहे.

**तक्ता 2: जेजेएममधील केंद्र आणि राज्यांचा वाटा**




*स्रोत: एसडब्ल्युएसएमने दिलेली माहिती*

घटकनिहाय निधी **तक्ता 2** मध्ये दिला आहे.

**तक्ता 2: केंद्र आणि राज्य हिश्श्याच्या घटकांचा तपशील**

***(₹ कोटी मध्ये)***

| वर्ष | केंद्रीय वाटा | | | | राज्य वाटा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | व्याप्ती निधी | सहाय्यक निधी | डब्ल्युक्यूएमएस | एकूण | व्याप्ती निधी | सहाय्यक निधी | डब्ल्युक्यूएमएस | एकूण |
| 2019-20 | 345.76 | 17.10 | 6.90 | 369.76 | 339.19 | 11.40 | 4.60 | 355.19 |
| 2020-21 | 439.74 | 23.04 | 9.14 | 471.92 | 425.22 | 15.11 | 6.00 | 446.33 |
| 2021-22 | 1563.89 | 83.33 | 33.33 | 1680.55 | 1679.32 | 55.84 | 22.30 | 1757.46 |
| 2022-23 | 3641.53 | 195.78 | 78.31 | 3915.62 | 3641.53 | 153.87 | 52.21 | 3847.61 |
| 2023-24 | 6923.16 | 372.21 | 148.89 | 7444.26 | 6923.16 | 248.14 | 99.26 | 7270.56 |
| **एकुण** | **12914.08** | **691.46** | **276.57** | **13882.11** | **13008.42** | **484.36** | **184.37** | **13677.15** |


*स्रोत: वर्षनिहाय उपयोगिता प्रमाणपत्रे*

राज्य आणि केंद्र सरकारच्या वाटपाव्यतिरिक्त, बँकेचे व्याज आणि इतर प्राप्ती देखील कार्यक्रम/एसएनए खात्यात जमा केल्या जातात.

2019-20 ते 2023-24 या कालावधीत ₹ 27559.26 कोटींच्या एकूण वाटपाच्या तुलनेत राज्यात जेजेएमच्या अंमलबजावणीवर एकूण खर्च ₹ 26410.51 कोटी झाला आहे.

महाराष्ट्रातील जेजेएमचा वर्षनिहाय खर्च **तक्ता 3** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 3: जेजेएम अंतर्गत झालेला खर्च**




*स्रोत: एसडब्ल्युएसएमने दिलेली माहिती*

## 1.6 लेखापरीक्षणाची उद्दिष्ट्ये

हे मूल्यांकन करण्यासाठी लेखापरीक्षण हाती घेण्यात आले की:

- कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये यशस्वीरित्या साध्य झाली आहेत,
- योजनेच्या नियोजन, अंमलबजावणी आणि कार्यान्वयनोत्तर व्यवस्थापनासाठी कार्यक्षम संस्थात्मक रचना अस्तित्वात आहे,
- आर्थिक संसाधनांचा वापर काटकसरीने आणि कार्यक्षमतेने केला गेला आहे; आणि
- कार्यक्रमाद्वारे निर्माण केलेली मालमत्ता पुढील दोन ते तीन दशकांसाठी शाश्वत असून त्यामुळे भावी पिढ्यांच्या जलसुरक्षेला बाधा येत नाही.

## 1.7 लेखापरीक्षणाचे निकष

निष्पादन लेखापरीक्षणासाठी स्वीकारलेल्या निकषांमध्ये खालील बाबींचा समावेश आहे:

- जेजेएमच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्त्वे.
- ग्रामीण कुटुंबांना सुरक्षित पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी ग्रामपंचायत आणि ग्राम पाणी स्वच्छता समितीसाठी मार्गदर्शिका.
- जल गुणवत्ता सनियंत्रण आणि देखरेख रचना.
- पाणी, स्वच्छता व आरोग्य यासाठी शाश्वत विकास उद्दिष्टांची बंधने आणि मानक संचालन कार्यपद्धती.
- सामान्य वित्तीय नियम, 2017 आणि मुंबई वित्तीय नियम.
- महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने निर्गमित केलेले व जेजेएमच्या अंमलबजावणीस मदत करणारे आदेश.
- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिनियम, नियम, विनियम, परिपत्रके आणि दरसूची.
- जिल्हा परिषद/ग्रामपंचायतीने निर्गमित केलेले अधिनियम, नियम, विनियम आणि सूचना.
- केंद्रीय दक्षता आयोगाने निर्गमित केलेली निविदा प्रक्रियेवरील मार्गदर्शक तत्त्वे.

## 1.8 लेखापरीक्षणाची व्याप्ती आणि कार्यपद्धती

निष्पादन लेखापरीक्षणात 2019-20 ते 2023-24 या कालावधीतील जेजेएम अंमलबजावणीचा समावेश होता. 7 ऑगस्ट 2024 रोजी झालेल्या आगमन बैठकी मध्ये लेखापरीक्षणाने प्रधान सचिव, डब्ल्युएसएसडी आणि उपसचिव, आरडीपीडी यांच्यासोबत लेखापरीक्षणाची व्याप्ती आणि कार्यपद्धती यावर चर्चा केली. लेखापरीक्षणासाठी जिल्ह्यांची निवड स्तरीकृत यादृच्छिक नमुना पद्धतीचा वापर करून करण्यात आली. जिल्ह्याने प्रदान केलेल्या एफएचटीसीच्या टक्केवारीच्या आधारावर, जिल्ह्यांची तीन स्तरांमध्ये विभागणी करण्यात आली, ज्यात अव्वल कामगिरी करणारे (60 *टक्के* आणि त्याहून अधिक), मध्यम कामगिरी करणारे (30-60 *टक्क्यांच्या* दरम्यान) आणि कमी कामगिरी करणारे (30 टक्क्यांपेक्षा कमी) यांचा समावेश होता. प्रत्येक स्तरातून दोन जिल्ह्यांची निवड पुनर्स्थापना न करता साध्या यादृच्छिक नमुना पद्धतीचा वापर करून करण्यात आली. पुढे, निवडलेल्या प्रत्येक जिल्ह्यातील दोन तालुके आणि निवडलेल्या प्रत्येक तालुक्यातील दोन गावांची निवड, योजना पूर्ण झालेल्या गावांच्या यादीतून यादृच्छिक आधारावर करण्यात आली. निष्पादन लेखापरीक्षणासाठी एकूण सहा[1] जिल्हे, 12 तालुके आणि 24 गावांची निवड करण्यात आली. निवडलेल्या जिल्ह्यांचा, तालुक्यांचा आणि गावांचा तपशील ***परिशिष्ट 1*** मध्ये सविस्तर दिला आहे.

लेखापरीक्षणाने जेजेएमच्या 480 लाभार्थ्यांचे (निवडलेल्या 24 गावांपैकी प्रत्येकी 20 लाभार्थी) सर्वेक्षण केले. योजनेची अंमलबजावणी, सामुदायिक योगदान आणि पाण्याची गुणवत्ता यांसारख्या प्रमुख मुद्द्यांच्या संदर्भात निवडलेल्या 24 ग्रामपंचायती/ व्हीडब्ल्युएससीचे देखील सर्वेक्षण करण्यात आले. योजनेच्या अंमलबजावणीचे मूल्यांकन करण्यासाठी आणि लाभार्थी सर्वेक्षण करण्यासाठी गावांची निवड करताना, ज्या गावांमध्ये पाणी पुरवठा योजना प्रत्यक्षपणे पूर्ण झाली आहे, अशा गावांच्या यादीतून नमुना म्हणून गावे निवडण्यात आली. निवडलेल्या गावांव्यतिरिक्त, लेखापरीक्षणाने अंमलबजावणी संस्था स्तरावर तपासलेल्या कामांच्या नोंदींच्या आधारावर गावांची निवड केली.

क्षेत्रीय लेखापरीक्षणामध्ये निवडलेल्या जिल्हा आणि तालुक्यांशी संबधीत, प्रधान सचिव, डब्ल्युएसएसडी आणि आरडीपीडी, एसडब्ल्युएसएम, डीडब्ल्युएसएम, झेडपी, एमजेपी आणि जीएसडीए यांचे विभाग आणि ग्रामपंचायत/गाव यांच्या कार्यालयांमध्ये ठेवलेल्या नोंदी आणि अभिलेख्यांची छाननी समाविष्ट होती.

[1] अहिल्यानगर, जळगाव, कोल्हापूर, पुणे, सोलापूर आणि ठाणे.

जेजेएम डॅशबोर्ड/ आयएमआयएस वर उपलब्ध असलेल्या माहितीचा वापर संदर्भ आणि चाचणी तपासणीसाठी देखील करण्यात आला.

11 डिसेंबर 2025 रोजी डब्ल्युएसएसडीच्या प्रधान सचिवांसोबत निर्गमन बैठक आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये लेखापरीक्षणाच्या निरीक्षणांवर चर्चा करण्यात आली. राज्य शासनाकडुन मिळालेली उत्तरे अहवालात समाविष्ट करण्यात आली आहेत. लेखापरीक्षणाचे निष्कर्ष पुढील प्रकरणांमध्ये चर्चिले आहेत.

## 1.9 अभिस्वीकृती

या निष्पादन लेखापरीक्षणाच्या दरम्यान विविध टप्प्यांवर डब्ल्युएसएसडी, आरडीपीडी, एसडब्ल्युएसएम आणि अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांची कार्यालये (झेडपी, एमजेपी आणि जीएसडीए) व त्यांच्या अधिकाऱ्यांनी दिलेले सहकार्य आणि मदत लेखापरीक्षणाद्वारे अभिस्वीकृत केलेली आहे.

# प्रकरण-II

# जल जीवन अभियानाच्या नियोजनाची रचना


## प्रकरण-II

## नियोजन

## 2. जल जीवन अभियानाच्या नियोजनाची रचना

जेजेएमने नियोजनासाठी तळापासून वरपर्यंतचा दृष्टिकोन स्वीकारला आहे. जिल्हा आणि राज्य स्तरासोबतच, जनगणना-संकेतित महसूल गाव हे जेजेएमच्या नियोजनाचे एकक आहे. खाली दर्शवलेला फ्लोचार्ट जेजेएमची बहुस्तरीय नियोजन प्रक्रिया स्पष्ट करतो:-

**जेजेएम नियोजन प्रक्रिया: एक तळापासून वरचा दृष्टिकोन**




निवडलेल्या जिल्ह्यांच्या, तालुक्यांच्या आणि गावांच्या पायाभूत सर्वेक्षण (बीएलएस), ग्राम कृती आराखडा आणि जिल्हा कृती आराखडा यांचेशी संबंधित नोंदींची छाननी करण्यात आली. लेखापरीक्षणातील निरीक्षणे खाली सविस्तर दिली आहेत.

### 2.1 ग्राम, जिल्हा आणि राज्य स्तरावर कृती आराखडा तयार करणे

#### 2.1.1 ग्राम पातळीवरील नियोजनातील त्रुटी

मार्गदर्शक तत्वांनुसार, व्हीडब्ल्युएससी मार्फत बीएलएस केले जाणार होते. बीएलएसच्या आधारे, उपलब्ध घरगुती नळजोडण्यांची संख्या आणि पुरवठा

होणाऱ्या पाण्याची गुणवत्ता व प्रमाण यांचे मूल्यांकन करण्यासाठी व्हीडब्ल्युएससी मार्फत ग्राम कृती आराखडा (व्हीएपी) तयार केला जाणार होता. जेजेएमच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, व्हीएपीत ग्रामपंचायत ठराव, घरांपर्यंतच्या व्याप्तीचा तपशील, पुढील 15 आणि 30 वर्षांसाठी लोकसंख्येचा अंदाज, शाळा/अंगणवाडी/ग्रामपंचायती इत्यादींचा तपशील, एफएचटीसीची उपलब्धता, पर्जन्यजल संचयन आणि शोषखड्डे, पाण्याची एकूण दैनंदिन गरज, सांडपाणी व्यवस्थापन इत्यादींचा समावेश असेल.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, तपासणी केलेल्या एकाही जिल्ह्यात बीएलएस करण्यात आले नव्हते. निवडलेल्या सर्व 24 गावांनी जरी व्हीएपी तयार केला असला तरी, 13 गावांच्या बाबतीत, व्हीडब्ल्युएससीने ग्रामपंचायतींकडून ठराव मंजूर करून न घेताच व्हीएपी तयार केला होता. चार प्रकरणांमध्ये, व्हीएपी मध्ये ग्रामपंचायत ठरावासंबंधी माहिती नमूद केली नव्हती. शिवाय, दहा गावांमध्ये व्हीडब्ल्युएससी एकतर अंशतः गठित होत्या किंवा गठितच नव्हत्या. निवडलेल्या एकाही गावात जलस्रोत शाश्वतता आणि सांडपाणी व्यवस्थापनासाठी नियोजन केले गेले नव्हते. हे देखील निदर्शनास आले की, वीस गावांच्या व्हीएपी मध्ये आवश्यक मापदंड जसे की सध्याची लोकसंख्या, घरांची व्याप्ती, एफएचटीसीची स्थिती, पाणीपुरवठ्याचा इतिहास, धुलाई/स्नानगृहाच्या जागेची ओळख, जलस्रोत/जमिनीची ओळख, वार्षिक ओ&एम शुल्क आणि सामुदायिक वाटा यासंबंधी तपशील नमूद केले नव्हते. शिवाय, लेखापरीक्षणाने तपासलेल्या 24 पैकी 20 व्हीएपी मध्ये संसाधन/स्रोत नकाशांकन (मॅपिंग) देखील केले गेले नव्हते. निवडलेल्या 24 गावांच्या व्हीएपी मध्ये आढळलेल्या त्रुटी ***परिशिष्ट II*** मध्ये सविस्तरपणे दिल्या आहेत. ***परिच्छेद 4.1.1*** मध्ये चर्चा केल्याप्रमाणे, बीएलएस न केल्यामुळे सर्व घरांची व्याप्ती सुनिश्चित झाली नाही.

बीएलएस न करण्यासंदर्भात, एसडब्ल्युएसएम ने उत्तर दिले की व्हीएपीला बीएलएस म्हणून गणले गेले आणि अंमलबजावणी सहाय्यक संस्था[2] (आयएसए) यांच्याशी सल्लामसलत करून व कार्य. अभि., झेडपीच्या तांत्रिक सहाय्याने ग्रामपंचायतीने व्हीएपी तयार केला होता.

[2] गैर-सरकारी संस्था/ ग्राम संघटना/ महिला स्व-सहायता गट/ ट्रस्ट/ प्रतिष्ठान यांना आयएसए म्हणून संबोधले जाते आणि गावांतर्गत पाणी पुरवठा पायाभूत सुविधांचे नियोजन, रचना, अंमलबजावणी, व्यवस्थापन, संचालन आणि देखभाल करण्यासाठी समुदायांना संघटित व सहभागी करून घेण्यात भागीदार म्हणून त्या महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

निर्गमन बैठ्कीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने उत्तर दिले की, विविध स्रोतांकडून उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे, वेगवेगळ्या संस्थांच्या (डीडब्ल्युएसएम, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण/ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, झेडपी, जीएसडीए, आयएसए) सहाय्याने ग्रामपंचायतीने व्हीएपी तयार केला होता.

तथापि, व्हीएपी तयार करण्यात असलेल्या त्रुटी लेखापरीक्षणाकडुन निदर्शनास आणल्यानंतर कोणतेही उत्तर दिलेले नाही.

### 2.1.2 जिल्हा स्तरावरील नियोजनातील त्रुटी

जेजेएमच्या मार्गदर्शक तत्वांनुसार डीडब्ल्युएसएम, डीएपी तयार करून त्याला अंतिम स्वरूप देते, जे अनिवार्यपणे जिल्ह्यांच्या सर्व व्हीएपीचे एकत्रीकरण असते. 2024 पर्यंत पूर्ण एफएचटीसी साध्य करण्यासाठी पथनकाशा देण्याव्यतिरिक्त, या योजनेत जिल्ह्याचे वार्षिक जल अंदाजपत्रक तयार करून जिल्ह्याच्या दीर्घकालीन पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षेचा समावेश असेल. पिण्याच्या पाण्याची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी करावयाचे जलसंधारणाचे प्रयत्न आणि सर्व हितधारकांच्या क्षमता बांधणीच्या गरजा यांचाही यात समावेश असेल. डीडब्ल्युएसएम, डीएपीच्या आधारावर, नळजोडणीची आवश्यकता, पाण्याची उपलब्धता, इतर संसाधने आणि हाती घ्यावयाच्या कामाचे प्रमाण यांचे मूल्यांकन करू शकेल.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, ***परिच्छेद 2.1.1*** मध्ये चर्चा केल्यानुसार आवश्यक मापदंडांचा समावेश न करता सहा निवडक जिल्ह्यांमध्ये व्हीएपी तयार करण्यात आले होते. याचा परिणाम डीएपी तयार करण्यावर झाला, कारण सहा निवडक जिल्ह्यांचे डीएपी जेजेएम मार्गदर्शक तत्वांनुसार तयार केले गेले नव्हते. सहा डीडब्ल्युएसएम पैकी, चार डीडब्ल्युएसएमने[3] संपूर्ण योजनेच्या कालावधीसाठी (2019-24) डीएपी तयार करण्याऐवजी एक ते चार वर्षांच्या कालावधीसाठी डीएपी तयार केले. सर्व सहा डीडब्ल्युएसएममध्ये, एफएचटीसी प्रदान करण्यासाठी त्रैमासिक आणि वार्षिक कृती आराखडा (एएपी), वित्तीय कृती आराखडा, जल सुरक्षा, जमिनीची आवश्यकता, विविध स्तरांवरील एकूण मनुष्यबळाची आवश्यकता, जलस्रोतांच्या प्रकारांचा अंदाज, वितरण जाळे, सांडपाणी आणि पुनर्वापर उपाययोजना आणि स्रोत शाश्वतता उपाययोजना इत्यादी आवश्यक मापदंडांचा समावेश केला गेला नव्हता. डीएपी तयार करण्यातील त्रुटींमुळे संसाधनांची आवश्यकता आणि जिल्ह्यात करावयाच्या कामाच्या प्रमाणाच्या मूल्यांकनावर परिणाम झाला, कारण जेजेएम-पूर्व काळात नियमित कामांसाठी

[3] अहिल्यानगर, जळगाव, पुणे आणि सोलापूर.

मंजूर केलेल्या त्याच मनुष्यबळासह अंमलबजावणी संस्था काम करत होत्या, ज्यामुळे मनुष्यबळाची कमतरता निर्माण झाली. पुढे, पुढील परिच्छेदांमध्ये चर्चा केल्याप्रमाणे, जलशुद्धीकरण प्रकल्पाची (डब्ल्युटीपी) आवश्यकता, गावातील सर्व वस्त्यांपर्यंत वितरण जाळे पोहोचवणे आणि प्रस्तावित स्रोतामधून पाण्याची उपलब्धता यांचे मूल्यांकन न करताच पाणी पुरवठा योजना (डब्ल्युएसएस) मंजूर करण्यात आल्या.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की, सर्व गावांना 100 *टक्के* एफएचटीसीने व्याप्त करण्यासाठी 2024 पर्यंतच्या नियोजनासह डीएपी तयार करण्यात आले होते. डीएपी तयार करण्यातील त्रुटी या योजनेच्या मोठ्या व्याप्तीमुळे होत्या. रिक्त जागा भरण्यासाठी वेळोवेळी अंमलबजावणी संस्था यांना सूचित करण्यात आले होते.

### 2.1.3 राज्य कृती आराखडा तयार करणे

जेजेएम मार्गदर्शक तत्त्वांच्या ***परिच्छेद 7.5*** मध्ये असे नमूद केले आहे की, प्रत्येक राज्याने पंचवार्षिक राज्य कृती आराखडा (एसएपी) तयार करणे आवश्यक आहे, ज्यामध्ये एफएचटीसीचे वार्षिक लक्ष्य आणि संबंधित आर्थिक गरजांचा अंदाज वर्तवला जाईल. जेजेएम मार्गदर्शक तत्त्वांच्या ***परिच्छेद 3.6.1*** मध्ये असे नमूद केले आहे की**,** डीएपीच्या आधारावर, एसडब्ल्युएसएमद्वारे एसएपी तयार करून अंतिम करणे अपेक्षित होते, ज्याचा उद्देश राज्याची संपूर्ण पिण्याच्या पाण्याची सुरक्षा साध्य करणे आणि राज्यातील सर्व ग्रामीण कुटुंबांना समाविष्ट करण्यासाठी आर्थिक नियोजनाकरिता त्याचा वापर करणे हा होता.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, एसडब्ल्युएसएमने राज्यासाठी एसएपी तयार केला नाही**,** त्याऐवजी 2020 ते 2024 या वर्षांसाठी वार्षिक कृती आराखडा **(**एएपी**)** तयार करण्यात आले. एसएपीच्या अनुपस्थितीत, योजनेच्या कालावधीत डब्ल्युएसएसची अंमलबजावणी एकसमान नव्हती, हे यावरून स्पष्ट होते की 75 *टक्के* डब्ल्युएसएस (51560 पैकी 38761) केवळ 2021-22 आणि 2022**-**23 या वर्षांमध्येच हाती घेण्यात आले. एसएपीच्या अनुपस्थितीत, जेजेएमच्या अंमलबजावणीसाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी प्रकल्पाची शक्यता तपासली गेली नाही, जमिनीची आवश्यकता योग्यरित्या मोजली गेली नाही ज्यामुळे योजनांच्या अंमलबजावणीस विलंब झाला ***(परिच्छेद 4.1.3),*** आयएसए साठी मूल्यांकन केले गेले नाही ज्यामुळे अकार्यक्षम आयएसएंची नियुक्ती झाली ***(परिच्छेद 6.7.2)***. शिवाय, ***परिच्छेद 6.1*** मध्ये चर्चा केल्याप्रमाणे कोणतेही ओ&एम धोरण अंतिम केले गेले नाही.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की संपूर्ण अभियान कालावधी 2020-2024 साठी आर्थिक नियोजनासह एएपी तयार करण्यात आले होते. जेजेएमच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये जमीन संपादनासाठी कोणतीही तरतूद नव्हती. त्यामुळे, ग्रामपंचायतीच्या सहकार्याने डीडब्ल्युएसएमद्वारे जमीन उपलब्ध करून दिली जाणार होती. ओ&एम धोरण राज्य शासनाच्या स्तरावर अंतिम करण्याच्या टप्प्यावर होते. पुढे असेही सांगण्यात आले की, अभियंत्यांची कमतरता भरून काढण्यासाठी, पाच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थांची (पीएमसी) नियुक्ती करण्यात आली होती आणि डीपीआर तयार करणे, देखरेख, मूल्यांकन आणि आयएमआयएस वरील माहिती अद्ययावत करण्यामध्ये समन्वयासाठी अतिरिक्त मनुष्यबळालाही परवानगी देण्यात आली होती.

जरी एएपी तयार केले गेले असले तरी, 2024 पर्यंत जेजेएमची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी एसएपी एक व्यापक मार्गदर्शक आराखडा म्हणून काम करण्यासाठी आवश्यक होते. जेजेएमच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या परिच्छेद 6.2 नुसार, योजनेसाठी जमिनीची उपलब्धता सुनिश्चित करण्याची जबाबदारी अंमलबजावणी संस्था ची होती; तथापि, विभागाने प्रभावी अंमलबजावणीसाठी जमिनीच्या उपलब्धतेवर देखरेख ठेवली नाही. शिवाय, पीएमसीची नियुक्ती करून आणि विविध कामांसाठी अतिरिक्त मनुष्यबळाला परवानगी देऊनही मार्च 2024 पर्यंत केवळ 24.64 *टक्के* (12,703) पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्या, जे अंमलबजावणीतील मोठी कमतरता दर्शवते.

## 2.2 अयोग्य नियोजन

जेजेएमचा उद्देश प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला दीर्घकालीन आधारावर पिण्याच्या पाण्याची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सहभागी ग्रामीण पाणी पुरवठा धोरणाचे नियोजन करण्यामध्ये राज्याला सहाय्य करणे, सक्षम करणे आणि सुविधा देणे, तसेच पाणी पुरवठा प्रणालीची शाश्वतता सुनिश्चित करण्यास सहाय्य करणे हा आहे. अयोग्य नियोजनाचे परिणाम खालीलप्रमाणे आहेत:

### 2.2.1 पाणीपुरवठ्याच्या हमीशिवाय योजनेला मंजुरी

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, एमजेपीने ठाणे जिल्ह्यातील नऊ[4] डब्ल्युएसएसचा पाणी पुरवठा 40 एलपीसीडी वरून 55 एलपीसीडी पर्यंत वाढवला,

[4] अघई (शहापूर तालुका), शेलार बोरपाडा, कारीवली, काटई, अंबाडी, रहानाळ, कोनगाव, बोरिवली (राहूर) आणि पडगा (भिवंडी तालुका).

ज्यामध्ये पाण्याचे पूर्वीचे स्रोत बीएमसी, एसटीईएम[5] मधून पाणी काढणे, भूजल किंवा पृष्ठजल होते. सप्टेंबर आणि ऑक्टोबर 2022 दरम्यान एमजेपीने या योजनांना मंजुरी दिली असली तरी, प्रस्तावित पाणी पुरवठा योजनांसाठी बीएमसीच्या स्रोतांमधून पाणी काढण्याच्या परवानगीसाठी मे 2023 मध्ये बीएमसीकडे संपर्क साधण्यात आला. याला प्रतिसाद म्हणून, बीएमसीने नकार दिला (जून 2023). या डब्ल्युएसएसवर (जुलै 2024) ₹ 35.69 कोटी खर्च करण्यात आला होता.

त्याचप्रमाणे, ठाणे जिल्हा परिषदेने बीएमसीच्या परवानगीशिवाय चार[6] योजनांसाठी जलस्रोतांची क्षमता 40 वरून 55 एलपीसीडी पर्यंत वाढवण्यासाठी बीएमसीच्या स्रोतांचा वापर करण्याचा प्रस्ताव दिला. या योजनांसाठी पाण्याचा पूर्वीचा स्रोत भूजल होता. या योजनांना सप्टेंबर 2021 मध्ये मंजुरी देण्यात आली. तथापि, बीएमसीच्या स्रोतातून पाणी घेण्याची परवानगी न मिळाल्याने (जुलै 2023) जलस्रोतांचे काम सुरू होऊ शकले नाही. बीएमसीने जलस्रोतांचे पाणी घेण्यास नकार दिल्यानंतर, नवीन स्रोताचा विचार करून चार जलस्रोतांचे पुनरावलोकन केले जात असल्याचे कार्य. अभि., जिल्हा परिषद ठाणे यांनी सांगितले (सप्टेंबर 2024).

एमजेपीअंतर्गत ठाणे जिल्ह्यातील नऊ जलस्रोतांना बीएमसीच्या स्रोतातून अतिरिक्त पाणी देण्यास नकार दिल्याच्या संदर्भात, शासनाने निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025) सांगितले की, सहा[7] गावांना बीएमसीकडून आधीच परवानगी मिळाली असून त्यांची दरडोई मागणी 40 एलपीसीडी आहे. ज्या दोन[8] गावांसाठी बीएमसीने मागणी मंजूर करण्यास नकार दिला होता, ती गावे एसटीईएम प्राधिकरणाच्या अखत्यारीत आणली जातील आणि त्यासंबंधीचा प्रस्ताव प्रगतीपथावर होता. उर्वरित पाडगा गावात, पर्यायी स्रोताचा प्रस्ताव प्रगतीपथावर होता. ठाणे जिल्हा परिषदेच्या चार योजनांबाबत कोणतेही उत्तर देण्यात आले नाही. प्रस्ताव अंतिम करण्यापूर्वी सर्व खबरदारी घेण्याबाबत अंतर्गत प्राधिकरणांना सूचना दिल्या जातील, असेही शासनाने सांगितले.

---

5 एसटीईएम वॉटर डिस्ट्रिब्युशन अँड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, जी ठाण्यात मोठ्या प्रमाणावर पाणी वितरणाचे व्यवस्थापन करते.

6 कुंदे, कुरुंद, कवड खुर्द, वाघिवली (भिवंडी तालुका).

7 अघई (शहापूर तालुका), शेलार बोरपाडा, कारीवली, अंबाडी, रहानाळ, आणि बोरिवली (राहूर).

8 काताई आणि कोंगाओन.

हे उत्तर स्वीकार्य नाही, कारण अंतर्गत प्राधिकरणांनी बीएमसीकडून पूर्वपरवानगी घेऊन योजनेसाठी खात्रीशीर पाणीस्रोताची उपलब्धता सुनिश्चित केली नाही, ज्यामुळे डब्ल्युएसएस अद्याप अपूर्ण राहिल्याने लाभार्थ्यांना योजनेच्या लाभांपासून वंचित राहावे लागले.

### 2.2.2 डब्ल्युटीपी शिवाय डब्ल्युएसएसची मंजुरी

उत्तर स्वीकार्य नाही कारण जेजेएम मार्गदर्शक तत्वांमध्ये (परिच्छेद 11.2) असे नमूद केले आहे की नळजोडणीची कार्यक्षमता ठरवण्यासाठी स्रोत शाश्वतता ही एक अट आहे. त्यामुळे, डब्ल्युएसएस तिच्या संपूर्ण डिझाइन कालावधीत कार्यरत राहील याची खात्री करण्यासाठी, पाणीटंचाईग्रस्त गावांसह सर्व डब्ल्युएसएससाठी स्रोत शाश्वततेचे उपाय योजणे आवश्यक होते. 13 गावांच्या व्हीएपी मध्ये असे नमूद केले होते की, तेथे कोणतीही विद्यमान पुनर्भरण संरचना नव्हती. यावरून असे दिसून येते की, योजनेअंतर्गत नियोजनासाठी व्हीएपी विचारात घेतल्या गेले नाहीत आणि पुनर्भरण संरचना या स्रोत शाश्वततेसाठी असतात, ज्या भूजल पुनर्भरणास मदत करतात आणि त्यामुळे भविष्यातील जलसुरक्षा सुनिश्चित होते याबद्दल अंमलबजावणी संस्थांना माहिती नव्हती.

## 6.6 सनियंत्रण

कार्यक्रमाच्या संसाधनांचा कार्यक्षम वापर सुनिश्चित करण्यासाठी सनियंत्रण आणि मूल्यांकन आवश्यक आहे, जेणेकरून नियोजित वेळेत अपेक्षित परिणाम साध्य होतील. शासकीय कार्यक्रम दीर्घ कालावधीसाठी आणि विविध स्तरांवर राबवले जात असल्यामुळे, एक मजबूत आणि प्रभावी कार्यक्रम सनियंत्रण व मूल्यांकन प्रणाली असणे अत्यावश्यक आहे. प्रभावी देखरेख यंत्रणा नळजोडण्यांची कार्यक्षमता, म्हणजेच विहित गुणवत्तेच्या पिण्याच्या पाण्याचा पुरेशा प्रमाणात नियमित पुरवठा, सुनिश्चित करेल.

### 6.6.1 जेजेएम अंतर्गत तांत्रिक हस्तक्षेप आणि नवकल्पनांचा अवलंब

ग्रामीण पाणी पुरवठा क्षेत्राला भूभाग, पुरेशा दर्जेदार पाण्याची उपलब्धता आणि इतर अनेक किरकोळ आव्हानांचा सामना करावा लागतो, हे लक्षात घेऊन भारत सरकारने जेजेएमच्या नियोजन आणि अंमलबजावणी दरम्यान वापरण्यासाठी नाविन्यपूर्ण तांत्रिक उपाययोजना सुचवल्या. काही प्रकरणांमध्ये, आव्हानांच्या गुंतागुंतीच्या स्वरूपामुळे, उपलब्ध तंत्रज्ञान एक सर्वसमावेशक उपाय प्रदान करण्यास असमर्थ ठरले आणि म्हणूनच नाविन्यपूर्ण उपायांची आवश्यकता होती.

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसंबंधी व्यवस्थापनाच्या निर्णय प्रक्रियेला आधार देण्यासाठी माहितीचे नियमित संकलन आणि विश्लेषण करण्याकरिता सेन्सर्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), सानुकूलित डॅशबोर्ड, स्काडा प्रणाली आणि जिल्हा मीटरिंग क्षेत्र (डीएमए) यांसारख्या माहिती तंत्रज्ञान साधनांचा वापर करण्याचे जेजेएमचे उद्दिष्ट आहे. हे सेन्सर्स विविध मापदंड मोजू शकतात, ज्यात वेगवेगळ्या स्रोतांमधून दररोज काढल्या जाणाऱ्या पाण्याचे प्रमाण, भूजल-आधारित योजनांसाठी बोअरवेलमधील पाण्याची पातळी आणि साठवण टाक्यांमधील ओव्हरफ्लो सेन्सर्सच्या आधारे पंपांचे कार्य यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, पीएच पातळी, नायट्रेट्सची उपस्थिती आणि क्षारता यांसारख्या पाण्याच्या गुणवत्तेच्या पैलूंवर लक्ष ठेवण्यासाठी मूलभूत सेन्सर्स स्थापित केले जाऊ शकतात. ही माहिती नियमित अंतराने संकलित केली जाऊ शकते आणि ती एकतर मॅन्युअल पुनर्प्राप्तीसाठी डेटा लॉगरमध्ये संग्रहित केली जाऊ शकते किंवा सिम कार्ड वापरून क्लाउड सर्व्हरवर प्रसारित केली जाऊ शकते. जेजेएम डॅशबोर्डद्वारे ही माहिती कोणीही हाताळु शकते.

लेखापरीक्षणामध्ये असे आढळून आले की, **तक्ता 20** मध्ये दर्शविल्याप्रमाणे निवडलेल्या सर्व जिल्ह्यांमधील अंमलबजावणी संस्थांनी सुचविलेल्या उपाययोजनांचा अवलंब (सप्टेंबर 2024 पर्यंत) केला नाही

**तक्ता 20: तांत्रिक हस्तक्षेपाचा तपशील आणि त्याचा अवलंब**

| सुचवलेला तांत्रिक हस्तक्षेप | हस्तक्षेप वापर | अवलंबनाची स्थिती |
|---|---|---|
| सेन्सर्स | पाण्याची पातळी, विसर्ग, पाण्याची गुणवत्ता, स्वयंचलित मोटरचे कार्य, माहिती नोंदवण्यासाठी डेटा लॉगर इत्यादींचे निरीक्षण करणे. | अवलंबीले नाही |
| स्काडा प्रणालीसह जिल्हा मीटरिंग क्षेत्र (डीएमए) | प्रसारणादरम्यान एमव्हीएस मधील पाण्याची हानी कमी करण्यासाठी | अवलंबीले नाही |
| इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी) | जेजेएम अंतर्गत तयार केलेल्या मालमत्तांच्या कार्यक्षमतेची देखरेख | अवलंबीले नाही |

निवडलेल्या जिल्ह्यांमधील कोणत्याही डब्ल्युएसएस मध्ये प्रभावी सनियंत्रणासाठी तांत्रिक देखरेख साधनांचा अवलंब करण्यात आला नाही.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की 389 बहु ग्राम योजना (एमव्हीएस) सेन्सर्सची स्थापना आणि आयओटीचा अवलंब करण्यात आला आहे आणि 617 मध्ये स्थापीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. महाराष्ट्रात डीएमए चा अवलंब करण्यात आलेला नाही. आता आयओटी च्या अंमलबजावणीसाठी बाह्य संस्थांकडून निधी मिळवण्याचे प्रस्ताव विचाराधीन आहेत.

वस्तुस्थिती अशी होती की, एमव्हीएस मध्ये स्काडा प्रणालीचा अवलंब करण्यात आला नव्हता, तर सेन्सर्स आणि आयओटीची अंशतः अंमलबजावणी करण्यात आली होती, मात्र एसव्हीएसमध्ये त्यांची स्थापना करण्यात आली नव्हती.

### 6.6.2 आयएमआयएस मधील विसंगती

प्रत्येक एफएचटीसीची नोंद घेण्यासाठी जेजेएम अंतर्गत एक समर्पित आयएमआयएस तयार करण्यात आले होते. जेजेएम, आयएमआयएस मध्ये जेजेएम डॅशबोर्डचा समावेश होता, ज्यामध्ये लाभार्थ्यांची संख्या, राज्य/जिल्हा/गावात दिलेल्या नळजोडणीची प्रगती, सर्व योजनांच्या भौतिक आणि आर्थिक प्रगतीचे निरीक्षण इत्यादी दर्शवले जात होते.

लेखापरीक्षणामध्ये निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये जेजेएम आणि आयएमआयएस मध्ये खालील तफावतीची प्रकरणे आढळून आली:

- **तक्ता 21** मध्ये दाखवल्याप्रमाणे, 2019-24 या वर्षात राज्यात निधी वितरणासाठी आणि खर्चासाठी जेजेएम, आयएमआयएस वर दर्शवलेला निधी, उपयोगीता प्रमाणपत्रांशी जुळला नाही:

**तक्ता 21: जेजेएम-आयएमआयएस आणि यूसी आकडेवारीमधील तफावत**

| वर्ष | यूसीनुसार वाटप केलेला निधी | | जेजेएम डॅशबोर्ड (फॉर्म- डी1) नुसार वाटप केलेला निधी | |
|---|---|---|---|---|
| | **केंद्र वाटा** | **राज्य वाटा** | **केंद्र वाटा** | **राज्य वाटा** |
| 2019-2024 | 13882.11 | 13677.15 | 13829.03 | 13406.90* |
| वर्ष | यूसीनुसार खर्च | | जेजेएम डॅशबोर्डनुसार खर्च (फॉर्म- डी1) | |
| | **केंद्र वाटा** | **राज्य वाटा** | **केंद्र वाटा** | **राज्य वाटा** |
| 2019-2024 | 13310.64 | 13099.87 | 12477.67 | 12573.24 |

** 2019-22 साठी निधी उपलब्ध नाही*

निवडलेल्या जिल्ह्यातील आयएमआयएस मधील विसंगतींची उदाहरणे खाली सविस्तरपणे दिली आहेत:

| **अंमलबजावणी संस्था** | **आयएमआयएसमधील विसंगती** | **विभागाचे उत्तर** |
|---|---|---|
| झेडपी, ठाणे | ठाणे जिल्ह्यात, जिल्हा परिषदेमार्फत आयएमआयएस मध्ये एकूण 1180 डब्ल्युएसएस अंमलबजावणीखाली असल्याचे दाखवण्यात आले होते. तथापि, जिल्हा परिषदेने अंमलबजावणीखाली असलेल्या 720 योजनांची यादी सादर केली. | कार्य. अभि., झेडपी, ठाणे यानी उत्तर दिले की, वास्तविक डब्ल्युएसएस 720 होत्या, तथापि, आयएमआयएस वर दर्शविलेल्या 1180 डब्ल्युएसएस मध्ये प्रत्यक्ष पाईपद्वारे पाणी पुरवठा योजना, एफएचटीसी, जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाड्या, एनआरडीडब्ल्युपी योजनेतील नोंदी आणि काही दुबार नोंदींचा समावेश होता.<br><br>हे उत्तर पटण्यासारखे नाही, कारण एफएचटीसी, जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाडी या योजना ठाणे जिल्हा परिषदेने जेजेएम अंतर्गत राबवलेल्या एकूण 720 योजनांचाच भाग होत्या. |
| झेडपी, अहिल्यानगर | कोपरगाव तालुक्याच्या मढी खुर्द गावात, आयएमआयएस नुसार एकूण नियोजित एफएचटीसी 10 असून घरांना 17 एफएचटीसी पुरवण्यात आल्या आहेत. | कार्य. अभि., झेडपी, अहिल्यानगर यांनी आयएमआयएस मधील माहिती जुळत नसल्याबद्दल उत्तर दिले नाही आणि ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार एफएचटीसी देण्यात आल्याचे सांगितले. |

| अंमलबजावणी संस्था | आयएमआयएसमधील विसंगती | विभागाचे उत्तर |
|---|---|---|
| एसडब्ल्युएसएम | आयएमआयएस डॅशबोर्डनुसार, जेजेएम अंतर्गत नळजोडणी मिळालेल्या कुटुंबांची एकूण संख्या 28,38,011 (जुलै 2024) (2020-21 ते 2023-24 या कालावधीत स्वस्रोताद्वारे नळजोडणी असलेल्या कुटुंबांची संख्या) होती. तथापि, या जोडण्या जलजीवन अभियानाच्या नियोजित लाभार्थ्यांचा भाग नव्हत्या. | प्रत्युत्तरात, एसडब्ल्युएसएमने सांगितले की, गावाचा एचजीजे दर्जा दर्शवण्यासाठी एनजेजेएमने आयएमआयएसमध्ये खाजगी जोडण्यांची नोंद करण्यास परवानगी दिली आहे.<br><br>तथापि, या खाजगी जोडण्यांमध्ये जेजेएमच्या नियमांनुसार पाण्याची गुणवत्ता आणि प्रमाण सुनिश्चित केले जाऊ शकले नाही. |
| एमजेपी, संगमनेर | कार्य. अभि.,एमजेपी, संगमनेरच्या आयएमआयएस डेटामध्ये एकूण 58 कामे पूर्ण झाल्याचे दाखवले आहे, तर विभाग प्रत्यक्षात 55 कामे करत आहे. | कार्य. अभि., एमजेपी संगमनेर यांनी उत्तर दिले की संगमनेर विभागाने एकूण 55 कामे पूर्ण केली असून, त्यापैकी तीन कामे आयएमआयएस (ऑक्टोबर 2024) मध्ये चुकून अपलोड झाली होती. |

या उदाहरणाने असे दिसून येते की, आयएमआयएस मध्ये प्रविष्ट केलेल्या माहितीची अचूकता सुनिश्चित केली गेली नव्हती.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की आयएमआयएस मधील माहीती जिल्हा स्तरावर अद्ययावत केली गेली होती, ज्यावर पुढे देखरेख आणि विश्लेषण केले गेले, विसंगतींचे दररोज निराकरण केले गेले आणि आयएमआयएस वर स्थिती दर्शवण्यासाठी एसडब्ल्युएसएम स्तरावर त्या सोडवल्या गेल्या. सर्व स्तरांवरील सद्यस्थिती दर्शवण्यासाठी आयएमआयएस अद्ययावत केले जाईल.

### 6.6.3 जिल्हा पाणी व स्वच्छता अभियानाच्या बैठका

जेजेएमच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये डीडब्ल्युएसएमच्या स्थापनेची तरतूद आहे, जी जिल्हा स्तरावर जेजेएमच्या सर्वांगीण अंमलबजावणीसाठी जबाबदार आहे. डीडब्ल्युएसएमचे प्रमुख जिल्हाधिकारी असतात आणि ही समिती गावांतर्गत डब्ल्युएसएस वर विचारविनिमय करून प्रशासकीय मंजुरी देणे, गावातील जलस्रोतांचे संरक्षण व संवर्धन योजना आखणे, सांडपाण्याचे व्यवस्थापन, आणि जलस्रोत/पाण्याचे स्रोत प्रदूषित होण्यापासून रोखणे इत्यादी बाबींवर विचार करण्यासाठी मासिक बैठका आयोजित करते.

निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये, लेखापरीक्षणात असे आढळून आले की डीडब्ल्युएसएमने बैठका आयोजित करण्याच्या वेळापत्रकाचे पालन केले नाही. पाच जिल्ह्यांमध्ये, डीडब्ल्युएसएमच्या बैठकांमध्ये 62 *टक्क्यांपासून* ते 78 *टक्क्यांपर्यंत* तूट होती. पुणे जिल्ह्यात एकूण बैठकांमध्ये कोणतीही तूट नसली तरी, 2019-20, 2020-21 आणि 2023-24 या वर्षांमध्ये बैठकांमध्ये तूट होती. डीडब्ल्युएसएमच्या बैठकांचा तपशील तक्ता 22 मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 22: डीडब्ल्युएसएमद्वारे आयोजित बैठका**

| जिल्ह्याचे नाव | सप्टेंबर 2020 ते मार्च 2024 या कालावधीत घ्यावयाच्या बैठकांची संख्या (55 महिने x दर महिन्याला एक) | बोलावण्यात आलेल्या बैठका | तूट/ आधिक्य | तूट (-) / आधिक्य (+) टक्केवारीमध्ये |
|---|---|---|---|---|
| अहिल्यानगर | 55 | 19 | 36 | (-) 65 |
| जळगाव | 55 | 20 | 35 | (-) 64 |
| कोल्हापूर | 55 | 21 | 34 | (-) 62 |
| पुणे | 55 | 62 | (+) 7 | (+) 13 |
| सोलापूर | 55 | 14 | 41 | (-) 75 |
| ठाणे | 55 | 12 | 43 | (-) 78 |

तक्ता 22 च्या विश्लेषणातून असे दिसून येते:

1. बैठकीच्या अनिवार्य वेळापत्रकाचे पद्धतशीरपणे पालन न करणे: जेजेएम मार्गदर्शक तत्त्वांनुसार, प्रशासकीय मंजुरी देणे, जलस्रोतांची शाश्वतता, सांडपाण्याचे व्यवस्थापन आणि जलस्रोत/तलाव प्रदूषित होण्यापासून रोखणे यासाठी डीडब्ल्युएसएमची मासिक बैठक होणे आवश्यक आहे. सप्टेंबर 2020 ते मार्च 2024 या कालावधीत नियोजित असलेल्या 55 बैठकांच्या तुलनेत, जिल्हावार बैठकांमध्ये 62 ते 78 *टक्क्यांची* तूट दिसून आली. ह्या केवळ काही तुरळक चुका नसून, जिल्हास्तरीय प्रशासकीय यंत्रणेतील प्रणालीगत कमकुवतपणा दर्शवते.

2. पुणे जिल्ह्यात एकूण 55 सभांच्या तुलनेत गरजेपेक्षा जास्त सभा (62 सभा) झाल्या असल्या तरी, निर्धारित वेळापत्रकाचे सातत्याने पालन झाले नाही, कारण 2019-20, 2020-21 आणि 2023-24 या वर्षांमध्ये सभांमध्ये कमतरता दिसून आली. यावरून सभा नियमित आणि पद्धतशीरपणे घेण्याऐवजी, त्या ठराविक कालावधीतच आयोजित केल्या गेल्या आणि इतर कालावधीत वगळल्या गेल्या, असे दिसून येते की सभा बोलावण्यात अनियमितता आहे.

3. गावांतर्गत डब्ल्युएसएसला प्रशासकीय मंजुरी देणे, जलस्रोतांचे संरक्षण व संवर्धनाचे नियोजन करणे, सांडपाण्याचे व्यवस्थापन करणे आणि जलस्रोतांचे प्रदूषण रोखणे ही जबाबदारी डीडब्ल्युएसएमची आहे. डीडब्ल्युएसएमच्या बैठकांमध्ये 62 ते 78 *टक्के* तूट असल्यामुळे, डब्ल्युएसएसचे सनियंत्रण करता

आले नाही आणि ***परिच्छेद 3.6, 4.1.1, 4.1.2, 4.1.3,*** आणि ***6.2*** मध्ये चर्चा केल्यानुसार, योजनांच्या खर्चात सुधारणा, जमिनीच्या अनुपलब्धतेमुळे डब्ल्युएसएसच्या अंमलबजावणीस विलंब, वन विभागाकडून परवानगी न मिळणे, वस्त्यांचा जेजेएम अंतर्गत समावेश न होणे, पाण्याची गुणवत्ता आणि सामुदायिक योगदानाची वसुली इत्यादी समस्या निदर्शनास आल्या.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की योजनेच्या अधिक चांगल्या अंमलबजावणीसाठी डीडब्ल्युएसएम ला नियमित बैठका घेण्याचे निर्देश दिले जातील.

### 6.6.4 पाणी पुरवठा योजनांची कामे आणि कामांच्या नोंदवहीसाठी त्रिपक्षीय करार

जेजेएम मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 3.5 मध्ये असे नमूद केले आहे की, जेजेएम अंतर्गत कामांसाठी डीडब्ल्युएसएम, व्हीडब्ल्युएससी आणि कार्यांवयन संस्था यांच्यासोबत त्रिपक्षीय करार करणे आवश्यक होते. या मार्गदर्शक तत्वांमध्ये असेही नमूद केले आहे की, त्रिपक्षीय तपासणीदरम्यान मोजमाप आणि चर्चेचे मुद्दे नोंदवण्यासाठी व्हीडब्ल्युएससीद्वारे एक कार्य नोंदवही (वर्क रजिस्टर) ठेवली जावी. पुढे, अंमलबजावणी संस्थांनी या कार्य नोंदवहींच्या आधारे कार्यांवयन संस्थाच्या देयकांवर प्रक्रिया करावी.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, निवडलेल्या सर्व जिल्ह्यांमध्ये, मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद केलेल्या त्रिपक्षीय करारांऐवजी, पाणी पुरवठा योजनांच्या कामांसाठीचे करार केवळ डीडब्ल्युएसएम आणि कंत्राटदार यांच्यातच (द्विपक्षीय) करण्यात आले होते. शिवाय, जेजेएम अंतर्गत कोणत्याही डब्ल्युएसएससाठी कार्य नोंदवही ठेवली गेली नव्हती. त्यामुळे, डब्ल्युएसएसच्या अंमलबजावणीच्या प्रक्रियेत ग्रामपंचायती/ व्हीडब्ल्युएससी यांचा सहभाग नव्हता.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की योजनेच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याकरिता अंमलबजावणी संस्थांना सूचना निर्गमित केल्या जातील.

### 6.6.5 तक्रार निवारण प्रणाली अंतर्गत न सोडवलेल्या तक्रारी

जेजेएमच्या मार्गदर्शक तत्वांनुसार, समुदायाला एक समर्पित टोल-फ्री क्रमांक, ऑनलाइन पोर्टल इत्यादींच्या माध्यमातून संबंधित डीडब्ल्युएसएम/ एसडब्ल्युएसएम कडे तक्रारी दाखल करण्यासाठी सक्षम केले जावे, असे नमूद केले होते. एसडब्ल्युएसएमने (मार्च 2024) “महाजल समाधान” नावाचे तक्रार निवारण पोर्टल सुरू केले, परंतु समर्पित टोल-फ्री क्रमांक अद्याप कार्यान्वित

व्हायचा होता. तक्रारींचे निराकरण करण्यासाठी ग्रामपंचायत/तालुका स्तरावर एक ते तीन दिवसांचा आणि जिल्हा स्तरावर दोन ते सात दिवसांचा कालावधी होता. प्रत्येक स्तरावरील न सुटलेल्या तक्रारी आपोआप संबंधित सीईओ, झेडपी किंवा एसई, एमजेपी यांच्याकडे पाठवल्या जात होत्या, जे पुढील कारवाईसाठी त्या तक्रारी योग्य अधिकाऱ्यांकडे सोपवत असत.

निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये, मार्च 2024 ते डिसेंबर 2024 या कालावधीत, पोर्टलवर एकूण 46 तक्रारी प्राप्त झाल्या, त्यापैकी 26 विविध स्तरांवर सोडवल्या गेल्या आणि 20 अनिर्णीत राहिल्या.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की, अंमलबजावणी संस्थांच्या सर्व अधिकाऱ्यांची वापरकर्ता निर्मिती आणि पडताळणी प्रक्रिया डिसेंबर 2024 पर्यंत पूर्ण झाली नव्हती. त्यामुळे, प्रणालीमध्ये काही तक्रारींकडे दुर्लक्ष झाले होते. तथापि, त्या तक्रारी प्रत्यक्षरित्या सोडवण्यात आल्या आहेत आणि प्रणालीमध्ये सर्व अधिकारी/ वापरकर्ते उपलब्ध नसल्यामुळे टोल फ्री क्रमांक सुरू करण्यात आला नाही.

## 6.7 प्रमुख हितधारकांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या

जेजेएमच्या अंमलबजावणीमध्ये ग्रामीण समुदाय, ग्रामपंचायत/ व्हीडब्ल्युएससी, एसडब्ल्युएसएम यांचा समावेश आहे. खालुन-वर नियोजनाचा आणि मागणी-आधारित विकेंद्रिकृत अंमलबजावणीचा दृष्टिकोन लक्षात घेऊन प्रत्येक हितधारकाची सविस्तर भूमिका तयार करण्यात आली आहे.

### 6.7.1 नेमून दिलेल्या भूमिका आणि जबाबदाऱ्यांची पूर्तता

ग्रामीण समुदायांना दीर्घकालीन पिण्याच्या पाण्याची सुरक्षा मिळवून देण्याकरीता जेजेएमच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व हितधारकांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आणि जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत: -

**ग्रामपंचायत/ व्हीडब्ल्युएससी** - ग्रामपंचायत/ व्हीडब्ल्युएससीची मुख्य भूमिका व्हीएपी तयार करणे, सामुदायिक योगदानासाठी समुदायाला प्रेरित करणे, एफटीकेचा वापर करुन पाण्याची गुणवत्ता चाचणी सुनिश्चितता, सांडपाण्याचा पुनर्वापर, जलसंधारण उपाययोजना इत्यादींसह गावांतर्गत पायाभूत सुविधांच्या बांधकामावर देखरेख करणे ही होती.

**अंमलबजावणी संस्था** - व्हीएपी तयार करण्यासाठी तांत्रिक मदत करणे, लाभार्थ्यांना नियमितपणे पुरेशा प्रमाणात सुरक्षित पिण्याचे पाणी पुरवणे, सामाजिक देखरेखीसाठी सार्वजनिक डोमेनमध्ये प्रत्यक्ष भौतिक आणि आर्थिक प्रगतीची माहिती देणे, पाणी पुरवठा योजनेच्या देखरेखीसाठी तांत्रिक देखरेख

साधनांचा अवलंब करणे, पाणी पुरवठा योजनेच्या सर्व मालमत्तांना जिओ-टॅग करणे इत्यादींसाठी अंमलबजावणी संस्था जबाबदार होत्या.

**जिल्हा पाणी व स्वच्छता अभियान** - डीडब्ल्युएसएम, व्हीएपी तयार करण्याची खात्री करणे आणि त्यास मान्यता देणे, प्रत्येक घराला एफएचटीसी देण्यासाठी डीएपी अंतिम करणे, बेअरफूट मेकॅनिक शोधणे आणि त्यांना ओ&एम साठी प्रशिक्षित करणे, आयएसए ची नियुक्ती करणे आणि त्यांची कामगिरी याची देखरेख करणे, पूर्ण झालेल्या योजना व्हीडब्ल्युएससी कडे सुपूर्द करणे इत्यादी साठी जबाबदार होते.

**राज्य जल आणि स्वच्छता अभियान**- एसडब्ल्युएसएम हे राज्य कृती आराखडा अंतिम करणे, योजनांसाठी जमिनीचे मूल्यांकन, आर्थिक नियोजन आणि निधीचा वेळेवर वापर, विविध विभाग आणि संस्थांमध्ये समन्वय साधणे इत्यादींसाठी जबाबदार होते.

लेखापरीक्षणामध्ये व्हीडब्ल्युएससी, डीडब्ल्युएसएम, अंमलबजावणी संस्था आणि एसडब्ल्युएसएम यांच्याकडून त्यांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या पार पाडण्यात त्रुटी आढळून आल्या, ज्याचा तपशील तक्ता 23 मध्ये दिला आहे.

**तक्ता 23: हितधारकांच्या भूमिकांचा तपशील आणि त्यांच्या पूर्ततेची स्थिती**

| भागधारक | जेजेएम मार्गदर्शक तत्त्वांनुसार नियोजनातील भूमिका | पूर्ण झाले की नाही | लेखापरीक्षणामध्ये पाहिलेले परिणाम |
|---|---|---|---|
| व्हीडब्ल्युएससी | व्हीएपी बनविणे सुनिश्चित करणे | काही प्रमाणात | व्हीडब्ल्युएससींनी ग्रामपंचायतींकडून मिळालेले ठराव/माहिती विचारात न घेता आणि सर्व आवश्यक मापदंडांचा समावेश न करता व्हीएपी तयार केला. ***(परिच्छेद 2.1.1)*** |
| | एफटीके वापरून आणि प्रयोगशाळांमार्फत पाण्याची नियतकालिक तपासणी करणे आणि त्याची माहिती समाजात प्रसारित करणे. | काही प्रमाणात | निवडलेल्या तीन गावांमध्ये एफटीके किटद्वारे पाण्याच्या गुणवत्तेच्या देखरेखीत कमतरता असल्याचे आढळून आले. निवडलेल्या पाच जिल्ह्यांमध्ये पाण्याच्या स्रोतांच्या तपासणीत लक्षणीय त्रुटी होत्या. ***(परिच्छेद 5.1.2)*** |
| डीडब्ल्युएसएम | जिल्हा कृती आराखडा अंतिम करणे | काही प्रमाणात | निवडलेल्या जिल्ह्यांमधील एकाही डीडब्ल्युएसएम ने जेजेएम मार्गदर्शक तत्वांमध्ये परिकल्पित केल्यानुसार, आवश्यक मापदंडांचा समावेश करून डीएपी तयार केला नाही. ***(परिच्छेद 2.1.2)*** |

| भागधारक | जेजेएम मार्गदर्शक तत्त्वांनुसार नियोजनातील भूमिका | पूर्ण झाले की नाही | लेखापरीक्षणामध्ये पाहिलेले परिणाम |
|---|---|---|---|
| | गवंडीकाम, प्लंबिंग, फिटिंग इत्यादी क्षेत्रांमधील कुशल मनुष्यबळ (बेअरफूट मेकॅनिक) शोधणे. | नाही | डीडब्ल्युएसएम आवश्यक कर्मचारी (बेअरफूट मेकॅनिक) शोधण्यात अयशस्वी ठरले. प्रत्येक जिल्ह्यातून नल जल मित्र ओळखण्यासाठी ऑक्टोबर 2024 मध्ये नामांकने मागवण्यात आली होती, परंतु शोधण्याची आणि प्रशिक्षणाची पुढील प्रक्रिया राज्यात अद्याप सुरू व्हायची होती. ***(परिच्छेद 6.3)*** |
| | गावातील जलस्रोतांचे संरक्षण आणि संवर्धन यावर विचार करण्यासाठी व त्यांना प्रशासकीय मंजुरी देण्यासाठी मासिक सभा आयोजित करणे | काही प्रमाणात | निवडलेल्या सहा अंमलबजावणी संस्थांपैकी पाचमध्ये डीडब्ल्युएसएम बैठका आयोजित करण्यात 62 *टक्क्यांपासून* ते 78 *टक्क्यांपर्यंत* कमतरता आढळली. ***(परिच्छेद 6.6.3)*** |
| अंमलबजावणी संस्था | सामाजिक देखरेखीसाठी प्रत्यक्ष भौतिक आणि आर्थिक प्रगती सार्वजनिक डोमेनमध्ये रिअल-टाइममध्ये उपलब्ध करून देणे. | काही प्रमाणात | आयएमआयएस वर चुकीचा, फुगवलेला आणि अप्रमाणित माहीती अपलोड केल्याची प्रकरणे निदर्शनास आली. ***(परिच्छेद 6.6.2)*** |
| | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसंबंधी व्यवस्थापकीय निर्णय घेण्यासाठी माहितीचे नियमित संकलन आणि विश्लेषण करण्याकरिता सेन्सर्स, आयओटी, सानुकूलित डॅशबोर्ड्स इत्यादींसारख्या आयटी साधनांचा प्रभावी वापर करणे. | नाही | कोणत्याही अंमलबजावणी संस्थांनी पाणी पुरवठा योजनेच्या यशस्वी देखरेखीसाठी तांत्रिक देखरेख साधनांचा अवलंब केला नाही. ***(परिच्छेद 6.6.1)*** |
| | जेजेएम राज्यांना पारदर्शकता आणि देखरेखीसाठी, पाणी पुरवठा योजनांच्या सर्व मालमत्तांना जिओ-टॅग करणे बंधनकारक करते. | नाही | लेखापरीक्षणात असे आढळून आले की, योजनांच्या पाण्याच्या स्रोतांना दोन-तीन वेळा जिओ-टॅग करून जिओ-टॅगिंगची उपलब्धी वाढवून दाखवण्यात आली होती. ***(परिच्छेद 4.5)*** |
| एसडब्ल्युएसएम | राज्य कृती योजनेला अंतिम रूप देणे | नाही | एसडब्ल्युएसएमने राज्यासाठी एसएपी तयार केले नाही. (***परिच्छेद 2.1.3)*** |

| भागधारक | जेजेएम मार्गदर्शक तत्वांनुसार नियोजनातील भूमिका | पूर्ण झाले की नाही | लेखापरीक्षणामध्ये पाहिलेले परिणाम |
|---|---|---|---|
| | पाणी आणि महसुलाची सतत होणारी हानी थांबवण्यासाठी अनधिकृत/मीटर नसलेल्या/हिशोब नसलेल्या जोडण्यांवर कारवाईचा निर्णय घेणे. | नाही | एसडब्ल्युएसएमने जेजेएम अंतर्गत नळजोडण्यांना मीटर लावण्याचे नियोजन केले नाही. शिवाय, योजनांच्या अंदाजपत्रकात मीटरच्या तरतुदींचा समावेश न करण्याचे निर्देशही दिले. (*परिच्छेद 4.2*) |
| | योजनांसाठी जमिनीची उपलब्धता | नाही | एसडब्ल्युएसएमने योजनेसाठी आवश्यक असलेल्या जमिनीची उपलब्धता न तपासल्यामुळे, जमिनी अभावी अनेक योजनांची पूर्तता रखडली आहे. *(परिच्छेद 4.1.3)* |

## 6.7.2 अयोग्य/अकार्यक्षम अंमलबजावणी सहाय्यक संस्थेची नियुक्ती

जेजेएमच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये गैर-सरकारी संस्था/ग्राम संघटना/महिला बचत गट/समुदाय-आधारित संस्था/ट्रस्ट/फाउंडेशन यांचा अंमलबजावणी सहाय्यक संस्था (आयएसए) म्हणून उल्लेख करण्यात आला आहे आणि योजनेच्या अंमलबजावणीमध्ये त्यांचा सहभाग असावा असे विहित केले आहे. मार्गदर्शक तत्वांमध्ये पुढे असे नमूद केले आहे की, गावांतर्गत पाणी पुरवठा पायाभूत सुविधांचे नियोजन, अंमलबजावणी आणि व्यवस्थापन करण्यासाठी समुदायांना संघटित आणि सहभागी करून घेण्यात भागीदार म्हणून आयएसएची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, राज्यातील 40323 गावांपैकी 10780 गावांमध्ये 2021-22 मध्ये 202 आयएसए नियुक्त करण्यात आले होते. तथापि, अकार्यक्षमतेमुळे 49 आयएसए बंद करण्यात आल्याने, 2022-23 मध्ये आयएसएची संख्या 174 आणि 2023-24 मध्ये 153 पर्यंत कमी झाली, ज्यात 7708 गावांचा समावेश होता.

सुरुवातीला सहा निवडक जिल्ह्यांमध्ये 47 आयएसए[34] नियुक्त करण्यात आले होते, परंतु अकार्यक्षमतेमुळे चार जिल्ह्यांमधील 16 आयएसए[35] बंद करण्यात आले. 2020-21 ते 2023-24 या कालावधीत, निवडक जिल्ह्यांमधील या

34 अहिल्यानगर-05+02=07, ठाणे-06, जळगाव-05+01=06, सोलापूर-09, पुणे-10, कोल्हापूर-09.

35 अहिल्यानगर-02, ठाणे-06, जळगाव-06, सोलापूर-02

आयएसए वर ₹ 191.31 लाख खर्च करण्यात आला. एसडब्ल्युएसएमने (डिसेंबर 2024) सांगितले की, असमाधानकारक किंवा अपूर्ण कामगिरीमुळे आयएसए बंद करण्यात आले. डीडब्ल्युएसएमला गावातील संघटनांची नियुक्ती करून उर्वरीत गावे समाविष्ट करण्यास सांगण्यात आले.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की, जल जीवन अभियानाअंतर्गत सामाजिक उपक्रम राबवण्यासाठी डीडब्ल्युएसएमला आयएसए म्हणून ग्रामसंघाला नियुक्त करण्याबाबत शासनाने पत्र निर्गमित केले आहे.

***परिच्छेद 2.1.1*** आणि ***6.2*** मध्ये चर्चा केल्याप्रमाणे, अकार्यक्षम/अपुरे आयएसए च्या नियुक्तीमुळे व्हीएपी तयार करण्यात त्रुटी, सामुदायिक योगदानाची वसुली न होणे इत्यादी समस्या निर्माण झाल्या.

### निष्कर्ष

राज्यात कोणतेही संचालन आणि देखभाल धोरण तयार केले गेले नव्हते किंवा अस्तित्वात नव्हते, यामुळे निर्माण केलेल्या पायाभूत सुविधांची देखभाल आणि योजनांच्या संचालनावर प्रतिकूल परिणाम झाला. एकूण देय असलेल्या ₹ 2043.79 कोटींच्या सामुदायिक योगदानापैकी, केवळ ₹ 21.72 कोटी म्हणजेच एक *टक्का* रक्कम जमा झाली. सर्व जिल्ह्यांमधील संघटन पातळीची नगण्यता ही सामुदायिक सहभाग यंत्रणेतील कमतरता दर्शवते आणि जेजेएम अंतर्गत अपेक्षित शाश्वतता व मालकी हक्काच्या उद्दिष्टांना कमी लेखते. डब्ल्युएसएसच्या प्रभावी देखभालीसाठी कुशल मनुष्यबळाचा शोध आणि विकास राज्यात अद्याप सुरू व्हायचा होता. निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये, हाती घेतलेल्या 1730 डब्ल्युएसएसमध्ये सौर आधारित पंपिंग प्रणाली होती आणि असे आढळून आले की केवळ 25 टक्के डब्ल्युएसएसची स्थापना पूर्ण झाली होती. भूजल-आधारित योजनांसाठी कृत्रिम पुनर्भरण प्रणालीचा अभाव होता.

जेजेएम-आयएमआयएस माहीती विश्वसनीय आणि अचूक नव्हती, जिल्हा पाणी व स्वच्छता अभियानाच्या बैठका नियमितपणे आयोजित केल्या जात नव्हत्या. पाण्याच्या पायाभूत सुविधांच्या देखरेखीसाठी सेन्सर्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), सानुकूलित डॅशबोर्ड, स्काडा प्रणाली आणि जिल्हा मीटरिंग क्षेत्र (डीएमए) यांसारखी आयटी साधने एकतर स्वीकारली गेली नाहीत किंवा त्यांची अंमलबजावणी अंशतः केली गेली. ग्रामपंचायत, अंमलबजावणी संस्था आणि कंत्राटदार यांचा समावेश असलेला पाणी पुरवठा योजनांसाठीचा त्रिपक्षीय करार केला गेला नाही, त्यामुळे पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीच्या प्रक्रियेत ग्रामपंचायती/व्हीडब्ल्युएससी सहभागी झाल्या नाहीत. सर्व गावांसाठी आयएसए नियुक्त केले गेले नव्हते आणि जे नियुक्त केले गेले ते अकार्यक्षम आढळले.

**शिफारशी**

- *शासनाने लवकरात लवकर ओ&एम धोरणाची निर्मिती व अंमलबजावणी सुनिश्चित करावी आणि डब्ल्युएसएसच्या कार्यक्षम ओ&एम साठी सामुदायिक योगदान गोळा करण्याकरिता एक प्रभावी यंत्रणा तयार करावी.*
- *प्रभावी देखभालीसाठी कुशल मनुष्यबळाच्या विकासाकरिता शासनाने यंत्रणा तयार करावी.*
- *शासनाने सर्व भूजल आधारित योजनांसाठी अंतिम टप्प्याकरिता जलसुरक्षा आणि कृत्रिम पुनर्भरण प्रणाली सुनिश्चित करावी.*
- *शासनाने जेजेएम-आयएमआयएस वरील माहितीची सत्यता सुनिश्चित करावी.*
- *डब्ल्युएसएसचे प्रभावी निरीक्षण सुनिश्चित करण्यासाठी, शासनाने जिल्हा पाणी व स्वच्छता अभियानाच्या नियमित बैठका घेणे, ग्रामपंचायतीचा समावेश असलेला त्रिपक्षीय करार करणे, तसेच सेन्सर्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज (आय ओ टी), सानुकूलित डॅशबोर्ड, स्काडा प्रणाली यांसारखी माहिती तंत्रज्ञान साधने आणि डीएमए यांसारख्या यंत्रणांचा अवलंब करण्याचा विचार करावा.*

**(दत्तप्रसाद शिरसाट)**

नागपुर — **महालेखाकार (लेखापरीक्षा-II)**

दिनांक: 29 जून 2026 — **महाराष्ट्र, नागपुर**

प्रतिहस्ताक्षरीत

नवी दिल्ली — **(के. संजय मुर्ती)**

दिनांक: 30 जून 2026 — **भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक**

# परिशिष्टे

# परिशिष्ट-I

*(संदर्भ: परिच्छेद 1.8; पृष्ठ 8)*

## निष्पादन लेखापरीक्षणासाठी निवडलेल्या जिल्ह्यांची, तालुक्यांची, गावांची, ग्रामपंचायतींची/ग्राम पाणी स्वच्छता समित्यांची यादी

| अनु क्रमांक | जिल्ह्याचे नाव | तालुक्याचे नाव | गावाचे नाव | ग्रामपंचायतीचे/ ग्राम पाणी स्वच्छता समितीचे नाव | सर्वेक्षणासाठी निवडलेल्या लाभार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारा (एफएचटीसी 60 टक्के व त्याहून अधिक प्रदान करण्यात यश) | | | | | |
| 1 | **जळगाव** | 1. बोडवाड | 1. पळसखेडे खु | 1. वरखेडे खु | 20 |
| | | | 2. साळशिंगी | 2. साळशिंगी | 20 |
| | | 2. धरणगाव | 3. चिंचपुरे बी.के. | 3. चिंचपुरेबीके | 20 |
| | | | 4. फुलपट | 4. फुलपट | 20 |
| 2 | **कोल्हापूर** | 3. हातकणंगले | 5. चोकाक | 5. चोकाक | 20 |
| | | | 6. मोजे निलेवाडी | 6. मोजे निलेवाडी | 20 |
| | | 4. कागल | 7. अर्जुनी | 7. अर्जुनी | 20 |
| | | | 8. केंबळी | 8. केंबळी | 20 |
| मध्यम कामगिरी करणारा (एफएचटीसी प्रदान करण्यात 30-60 टक्के यश) | | | | | |
| 3 | **सोलापूर** | 5. दक्षिण सोलापूर | 9. हत्तरसंग | 9. हत्तरसंग | 20 |
| | | | 10. आचेगाव | 10. आचेगाव | 20 |
| | | 6. संगोला | 11. डिकसल | 11. डिकसल | 20 |
| | | | 12. अनकडल | 12. अनकडल | 20 |
| 4 | **अहिल्यानगर (पूर्वीचे अहमदनगर)** | 7. नेवासा | 13. पुनतगाव | 13. पुनतगाव | 20 |
| | | | 14. शिंगवेतुकाई | 14. शिंगवेतुकाई | 20 |
| | | 8. कोपरगाव | 15. तळेगाव माळे | 15. तळेगाव माळे | 20 |
| | | | 16. मढी खु | 16. मढी खु | 20 |
| कमी कामगिरी करणारे (एफएचटीसी प्रदान करण्यातील कामगिरी 30 टक्क्यांपेक्षा कमी) | | | | | |
| 5 | **ठाणे** | 9. शहापूर | 17. वेहलोली | 17. वेहलोली | 20 |
| | | | 18. कुकंभे | 18. बिरवाडी | 20 |
| | | 10. भिवंडी | 19. डोहाळे | 19. डोहाळे | 20 |
| | | | 20. पिसे | 20. पिसे | 20 |
| 6 | **पुणे** | 11. भोर | 21. सारोळे | 21. सारोळे | 20 |
| | | | 22. सावरदरे | 22. सावरदरे | 20 |
| | | 12. मावळ | 23. इंदुरी | 23. इंदुरी | 20 |
| | | | 24. सांगवडे | 24. सांगवडे | 20 |

## परिशिष्ट-II

***(संदर्भ: परिच्छेद 2.1.1; पृष्ठ 12)***

### ग्राम कृती आराखडा तयार करण्यातील त्रुटी

| अनु क्रमांक | गावाचे आणि तालुक्याचे नाव | जिल्ह्याचे नाव | ग्राम कृती आराखड्यातील कमतरता |
|---|---|---|---|
| 1 | शिंगवेतुकाई, नेवासा तालुका | अहिल्यानगर | ग्रामपंचायत ठराव मंजूर झाला नाही. व्हीडब्ल्युएससी एकतर अंशतः किंवा अजिबातच गठित झाली नाही. सध्याची लोकसंख्या, कुटुंबे आणि एफएचटीसी दर्शविलेले नाहीत. पाणीपुरवठ्याचा इतिहास आणि धुलाई/स्नानगृह तालुक्याच्याओळखीचा तपशील दर्शविलेला नाही. व्हीएपीच्या मुद्दा 28 नुसार पाण्याचा स्रोत/ओळखलेली जमीन, जमिनीचे हस्तांतरण, वार्षिक देखभाल व दुरुस्ती शुल्क आणि सामुदायिक वाटा इत्यादी माहिती समाविष्ट केली गेली नाही. संसाधन/स्रोत नकाशांकन केले गेले नाही. |
| 2 | पुनतगाव, नेवासा तालुका | अहिल्यानगर | |
| 3 | चिंचपुरेबुद्रुक, धरणगाव तालुका | जळगाव | |
| 4 | फुलपत, धरणगाव तालुका | जळगाव | |
| 5 | पळसखेडे खुर्द, बोदवड तालुका | जळगाव | |
| 6 | साळशिंगी, बोदवड तालुका | जळगाव | |
| 7 | मढी खुर्द, कोपरगाव तालुका | अहिल्यानगर | ग्रामपंचायतीचा ठराव व्हीएपीला जोडलेला नव्हता. सद्य लोकसंख्या, कुटुंबसंख्या आणि एफएचटीसी दर्शवलेले नव्हते. पाणीपुरवठ्याचा इतिहास, धुलाई/स्नानगृह तालुक्याच्याओळखीचा तपशील दर्शवलेला नव्हता. व्हीएपीच्या मुद्दा 28 नुसार पाण्याचा स्रोत/ओळखलेली जमीन, जमिनीचे हस्तांतरण, वार्षिक देखभाल व दुरुस्ती शुल्क आणि सामुदायिक वाटा इत्यादी माहिती समाविष्ट केली नव्हती. संसाधन/स्रोत नकाशांकन केलेले नव्हते. |
| 8 | तळेगाव माले, कोपरगाव तालुका | अहिल्यानगर | |
| 9 | हत्तरसंग, दक्षिण सोलापूर तालुका | सोलापूर | |
| 10 | आचेगाव, दक्षिण सोलापूर तालुका | सोलापूर | |
| 11 | चोकाक, हातकणनगले तालुका | कोल्हापूर | |
| 12 | सावरदरे, भोर तालुका | पुणे | |
| 13 | डिकसळ, सांगोला तालुका | सोलापूर | ग्रामपंचायत ठराव मंजूर झाला नाही. व्हीडब्ल्युएससी गठीत केली नाही. सध्याची लोकसंख्या, कुटुंबे आणि एफएचटीसी दर्शविलेले नाहीत. पाणीपुरवठ्याचा इतिहास दर्शविलेला नाही. धुलाई/स्नानगृह तालुक्याच्याओळखीचा तपशील दर्शविलेला नाही. व्हीएपीच्या मुद्दा 28 नुसार पाण्याचा स्रोत/जमीन ओळखणे, जमीन केव्हा हस्तांतरित केली जाईल, वार्षिक देखभाल आणि दुरुस्ती शुल्क आणि सामुदायिक वाटा |
| 14 | अंकधळ, सांगोला तालुका | सोलापूर | |
| 15 | सांगवडे, मावळ तालुका | पुणे | |

| अनु क्रमांक | गावाचे आणि तालुक्याचे नाव | जिल्ह्याचे नाव | ग्राम कृती आराखड्यातील कमतरता |
|---|---|---|---|
| | | | इत्यादी माहिती समाविष्ट केली गेली नाही. संसाधन/स्रोत नकाशांकन केले गेले नाही. |
| 16 | सरोला, भोर तालुका | पुणे | ग्रामपंचायत ठराव मंजूर झाला, परंतु तो जोडलेला नाही. व्हीडब्ल्युएससी स्थापन केली नव्हती. सध्याची लोकसंख्या, कुटुंबे आणि कुटुंब गृहसेवा करार एफएचटीसी दर्शवलेले नाहीत. पाणीपुरवठ्याचा इतिहास दर्शवलेला नाही. धुलाई/स्नानगृह तालुक्याच्या ओळखीचा तपशील दर्शवलेला नाही. व्हीएपीच्या मुद्दा 28 नुसार, पाण्याचा स्रोत/जमीन ओळखणे, जमिनीचे हस्तांतरण केव्हा होईल, वार्षिक देखभाल व दुरुस्ती शुल्क आणि सामुदायिक वाटा इत्यादी माहिती समाविष्ट केलेली नाही. संसाधन/स्रोत नकाशांकन केलेले नाही. |
| 17 | केंबळी, कागल तालुका | कोल्हापूर | ग्रामपंचायत ठराव मंजूर झाला नाही. सध्याची लोकसंख्या, कुटुंबे आणि एफएचटीसी दर्शविलेले नाहीत. पाणीपुरवठ्याचा इतिहास दर्शविला गेला नाही. धुलाई/स्नानगृह तालुक्याच्या ओळखीचा तपशील दर्शविला गेला नाही. व्हीएपीच्या मुद्दा 28 नुसार पाण्याचा स्रोत/ओळखलेली जमीन, जमिनीचे हस्तांतरण केव्हा होईल, वार्षिक देखभाल आणि दुरुस्ती शुल्क आणि सामुदायिक वाटा इत्यादी माहिती समाविष्ट केली गेली नाही. संसाधन/स्रोत नकाशांकन केले गेले नाही. |
| 18 | अर्जुनी, कागल तालुका | कोल्हापूर | |
| 19 | निलेवाडी, हातकणनगले तालुका | कोल्हापूर | |
| 20 | इंदुरी, मावळ तालुका | पुणे | |
| 21 | वेल्होली बीके, शहापूर तालुका | ठाणे | ग्रामपंचायत ठरावाबाबत तपशील देण्यात आला नाही. अभिसरणाचा तपशील समाविष्ट केला नाही. |
| 22 | कुकंभे, शहापूर तालुका | ठाणे | |
| 23 | डोहाळे, भिवंडी तालुका | ठाणे | ग्रामपंचायत ठरावासंबंधी तपशील देण्यात आला नाही. अभिसरणाचा तपशील समाविष्ट केला नाही. |
| 24 | पिसे, भिवंडी तालुका | ठाणे | |

# परिशिष्ट -III

*(संदर्भ: परिच्छेद 3.3; पृष्ठ 28)*

## केंद्र आणि राज्याच्या वाट्याच्या अखर्चीत रकमेवर मिळालेल्या व्याजाच्या हस्तांतरणाचा तपशील

| वर्ष | अखर्चीत रकमेवर मिळणारे व्याज (रुपयांमध्ये) | रक्कम भरण्याची निर्धारीत तारीख | रक्कम भरण्याची तारीख | विलंब (दिवसांच्या संख्येत) |
|---|---|---|---|---|
| **जेजेएम निधीतील केंद्राचा वाटा** | | | | |
| 2020-21 | 188,39,562 | 15.10.2021 | 02.11.2021 | 18 |
| 2021-22 | 12,69,25,848 | 08.04.2022 | 19.04.2022 | 11 |
| 2022-23 | 10,08,63,175 | 07.04.2023 | 02.07.2024 | 452 |
| | 27,56,850 | 05.04.2023 | 07.07.2023 | 91 |
| | 28,13,96,664 | 05.04.2023 | 18.05.2023 | 41 |
| 2023-24 | 56,92,24,221 | 05.04.2024 | 30.04.2024 | 25 |
| एकूण | 110,00,06,320 | | | |
| **जेजेएम निधीतील राज्याचा वाटा** | | | | |
| 2020-21 | 1,88,39,562 | 15.10.2021 | 23.08.2023 | 677 |
| 2021-22 | 12,69,25,848 | 08.04.2022 | 23.08.2023 | 502 |
| 2022-23 | 10,08,63,176 | 07.04.2023 | 04.07.2024 | 454 |
| | 27,56,849 | 07.04.2023 | 23.08.2023 | 138 |
| | 28,13,96,664 | 07.04.2023 | 23.08.2023 | 138 |
| 2023-24 | 56,92,24,220 | 05.04.2024 | 01.05.2024 | 26 |
| एकूण | 110,00,06,319 | | | |

# परिशिष्ट-IV

*(संदर्भ: परिच्छेद 4.1; पृष्ठ 40)*

## निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये एफएचटीसीची प्रगती

| वर्ष | एएपी म्हणून आवश्यक असलेल्या एफएचटीसी ची संख्या | घरगुती नळजोडणी ची संख्या | खाजगी/ स्वतःच्या स्रोतांतुन घरगुती नळ जोडण्यांची संख्या | एफएचटीसी प्रदान करण्यातील कामगिरी (टक्केवारी) | खाजगी/स्वतः च्या स्रोतांसह एकूण घरगुती नळजोडणी. | उपलब्धी - टॅप कनेक्शन (खाजगी/स्व तःच्या स्रोतांसह) (टक्केवारीत) |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5 (3/2x100)** | **6 (3+4)** | **7 (6/2x100)** |
| **अहिल्यानगर** | | | | | | |
| 2019-20 | - | 95791 | - | - | - | - |
| 2020-21 | 204453 | 82448 | 152447 | 40.33 | 234895 | 114.89 |
| 2021-22 | 90522 | 17184 | 90153 | 18.98 | 107337 | 118.58 |
| 2022-23 | 143552 | 10085 | 13981 | 7.03 | 24066 | 16.76 |
| 2023-24 | 124999 | 111228 | 3150 | 88.98 | 114378 | 91.50 |
| **एकूण** | **563526** | **316736** | **259731** | **56.21** | **576467** | **102.30** |
| **जळगाव** | | | | | | |
| 2019-20 | - | 10478 | - | - | - | - |
| 2020-21 | 251215 | 179330 | 98883 | 71.39 | 278213 | 110.75 |
| 2021-22 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | - |
| 2022-23 | 309 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 2023-24 | 10648 | 9806 | 0 | 92.09 | 9806 | 92.09 |
| **एकूण** | **262172** | **199614** | **98883** | **76.14** | **298497** | **113.86** |
| **कोल्हापूर** | | | | | | |
| 2019-20 | - | 52356 | - | - | - | - |
| 2020-21 | 64082 | 129194 | 2210 | 201.61 | 131404 | 205.06 |
| 2021-22 | 102026 | 18275 | 15157 | 17.91 | 33432 | 32.77 |
| 2022-23 | 85924 | 42053 | 22093 | 48.94 | 64146 | 74.65 |
| 2023-24 | 91278 | 38362 | 46903 | 42.03 | 85265 | 93.41 |
| **एकूण** | **343310** | **280240** | **86363** | **81.63** | **366603** | **106.78** |
| **पुणे** | | | | | | |
| 2019-20 | - | 40087 | - | - | - | - |
| 2020-21 | 181099 | 39559 | 181008 | 21.84 | 220567 | 121.79 |
| 2021-22 | 187603 | 5912 | 136192 | 3.15 | 142104 | 75.75 |
| 2022-23 | 141691 | 13019 | 29094 | 9.19 | 42113 | 29.72 |
| 2023-24 | 250942 | 48332 | 21857 | 19.26 | 70189 | 27.97 |
| **एकूण** | **761335** | **146909** | **368151** | **19.30** | **515060** | **67.65** |

| वर्ष | एएपी म्हणून आवश्यक असलेल्या एफएचटीसी ची संख्या | घरगुती नळजोडणी ची संख्या | खाजगी/ स्वतःच्या स्रोतांतुन घरगुती नळ जोडण्यांची संख्या | एफएचटीसी प्रदान करण्यातील कामगिरी (टक्केवारी) | खाजगी/स्वतःच्या स्रोतांसह एकूण घरगुती नळजोडणी. | उपलब्धी - टॅप कनेक्शन (खाजगी/स्वतःच्या स्रोतांसह) (टक्केवारीत) |
|---|---|---|---|---|---|---|
| **सोलापूर** | | | | | | |
| 2019-20 | - | 1858 | - | - | - | - |
| 2020-21 | 163683 | 97229 | 85371 | 59.40 | 182600 | 111.56 |
| 2021-22 | 102360 | 38091 | 37723 | 37.21 | 75814 | 74.07 |
| 2022-23 | 44691 | 17321 | 25403 | 38.76 | 42724 | 95.60 |
| 2023-24 | 72622 | 29216 | 38945 | 40.23 | 68161 | 93.86 |
| **एकूण** | **383356** | **183715** | **187442** | **47.92** | **371157** | **96.82** |
| **ठाणे** | | | | | | |
| 2019-20 | - | 8450 | - | - | - | - |
| 2020-21 | 144537 | 30897 | 26190 | 21.38 | 57087 | 39.50 |
| 2021-22 | 92795 | 8819 | 1981 | 9.50 | 10800 | 11.64 |
| 2022-23 | 47090 | 3984 | 4613 | 8.46 | 8597 | 18.26 |
| 2023-24 | 116406 | 22849 | 9868 | 19.63 | 32717 | 28.11 |
| **एकूण** | **400828** | **74999** | **42652** | **18.71** | **117651** | **29.35** |

*स्रोत: विभागाकडून मिळालेली माहिती नोंद: 2019-20 मध्ये कोणतेही लक्ष्य निश्चित करण्यात आले नाही.*

***गोषवारा***

| जिल्ह्याचे नाव | एएपी म्हणून आवश्यक असलेल्या एफएचटीसी ची संख्या | दिलेल्या घरगुती नळ जोडण्यांची संख्या | खाजगी/स्वतः च्या स्रोतांकडून घरगुती नळजोडणीची संख्या | एफएचटीसी प्रदान करण्यातील कामगिरी (टक्केवारीत) | खाजगी/स्वतःच्या स्रोतांसह संपूर्ण घरगुती नळजोडणी. | उपलब्धी - खाजगी/स्वतःच्या स्रोतांसह टॅप कनेक्शन (टक्केवारीत) |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5 (3/2 x 100)** | **6 (3+4)** | **7 (6/2 x 100)** |
| अहिल्यानगर | 563526 | 316736 | 259731 | 56.21 | 576467 | 102.30 |
| जळगाव | 262172 | 199614 | 98883 | 76.14 | 298497 | 113.86 |
| कोल्हापूर | 343310 | 280240 | 86363 | 81.63 | 366603 | 106.78 |
| पुणे | 761335 | 146909 | 368151 | 19.30 | 515060 | 67.65 |
| सोलापूर | 383356 | 183715 | 187442 | 47.92 | 371157 | 96.82 |
| ठाणे | 400828 | 74999 | 42652 | 18.71 | 117651 | 29.35 |
| **एकूण** | **2714527** | **1202213** | **1043222** | **44.29** | **2245435** | **82.72** |

# परिशिष्ट -V

*(संदर्भ: परिच्छेद 4.1.3; पृष्ठ 46)*

## जमिनीच्या समस्यांमुळे डब्ल्युएसएसच्या अंमलबजावणीस झालेला विलंब

*(₹ कोटी मध्ये)*

| अनु क्रमांक | डब्ल्युएसएस चे नाव | कामाची निविदा किंमत (रुपये कोटींमध्ये) | कामाच्या ऑर्डरची तारीख | निर्धारित पूर्ण होण्याची तारीख | केलेल्या कामाची किंमत | महिन्यांमधील विलंब (डिसेंबर 2025 पर्यंत) | विलंबाचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यामधील लसुर्णे एकल ग्राम योजना (एसव्हीएस) | 10.17 | नोव्हेंबर 2021 | नोव्हेंबर 2023 | 8.00 | 26 | विद्यमान बॅलन्सिंग टँकच्या जमीनमालकांनी कामाला विरोध केल्यामुळे नंतर बॅलन्सिंग टँकची जागा बदलण्यात आली. 31.12.2025 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. |
| 2 | कदमवाकवस्ती एसव्हीएस, पुणे | 80.37 | ऑगस्ट 2022 | फेब्रुवारी 2025 | 48.00 | 10 | ईएसआर आणि डब्ल्युटीपीच्या बांधकामासाठी जमीन महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडून (एमकेकेडीसी) नाममात्र दरात उपलब्ध करून दिली जाणार होती. तथापि, नंतर (जुलै 2024 मध्ये), महामंडळाने कळवले की ही जमीन प्रति वर्ष ₹ 0.65 कोटी भाडेतत्त्वावर उपलब्ध करून दिली जाईल. |
| 3 | पुणे जिल्ह्यातील टिळेकरवाडी एस.व्ही.एस | 18.14 | फेब्रुवारी 2023 | जून 2025 | 13.60 | 6 | साठवण टाकी आणि डब्ल्युटीपीच्या बांधकामासाठी उपलब्ध करून दिलेली जमीन पुरेशी नव्हती. आयएने टाकीची खोली वाढवून तिची क्षमता सुधारण्याचा प्रस्ताव दिला, ज्यासाठी सुधारित अंदाजपत्रक सादर करण्यात आले. आयएने पुरेशी जमीन उपलब्ध करून न दिल्यामुळे विलंब झाला आणि खर्चात वाढ झाली. |

| अनु क्रमांक | डब्ल्युएसएस चे नाव | कामाची निविदा किंमत (रुपये कोटींमध्ये) | कामाच्या ऑर्डरची तारीख | निर्धारित पूर्ण होण्याची तारीख | केलेल्या कामाची किंमत | महिन्यांमधील विलंब (डिसेंबर 2025 पर्यंत) | विलंबाचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | जळगाव जिल्ह्यातील वधोडा म.वि | 13.68 | नोव्हेंबर 2022 | मे 2024 | 7.11 | 19 | ग्रा.प.कडून आवश्यक जमीन हस्तांतरित करण्यास विलंब झाल्यामुळे हेडवर्क, जॅक वेल, डब्ल्युटीपी आणि ईएसआरची कामे प्रलंबित होती.. |
| 5 | सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यात, मौजा चिखलठाणा क्र. २ येथील रेट्रोफिटिंग योजना | 0.54 | डिसेंबर 2022 | डिसेंबर 2023 | 0.24 | 24 | गावकऱ्यांनी कामाबद्दल तक्रार केल्यामुळे विहिरीच्या जागेवरून वाद निर्माण झाला आणि काम थांबवण्यात आले. नंतर, अस्तित्वात असलेल्या विहिरीची खोली वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. |
| 6 | पुणे जिल्ह्यातील वधू खुर्द एस.व्ही.एस | 4.40 | नोव्हेंबर 2022 | सप्टेंबर 2023 | 3.78 | 27 | साठवण टाकीसाठी जमीन उपलब्ध नसल्यामुळे |
| 7 | कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यामधील निगावे खुर्द येथे एसव्हीएसचे रेट्रोफिटिंग | 4.11 | फेब्रुवारी 2023 | फेब्रुवारी 2024 | 3.49 | 23 | डब्ल्युटीपीसाठी जमिनीची निश्चिती न झाल्यामुळे कामाला विलंब झाला, कारण डब्ल्युटीपी साठी राखून ठेवलेली जमीन रस्त्यालगत होती आणि रस्तारुंदीकरण झाल्यास डब्ल्युटीपी साठीची जमीन अपुरी पडली असती. |

# परिशिष्ट-VI

*(संदर्भ: परिच्छेद 4.3; पृष्ठ 49)*

## नियोजित आणि प्रदान केलेल्या एफएचटीसीच्या माहितीमधील वर्षनिहाय तफावत)

| वर्ष | एसडब्ल्युएसएमने दिलेली माहिती | | जिल्ह्याने दिलेली माहिती | | फरक/ न जुळणारा | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एएपीनुसार आवश्यक असलेल्या एफएचटीसींची संख्या | घरासाठी कनेक्शन पुरवले आहे | एएपीनुसार आवश्यक असलेल्या एफएचटीसींची संख्या | घरासाठी कनेक्शन पुरवले आहे | एएपीनुसार आवश्यक असलेल्या एफएचटीसींची संख्या | घरासाठी कनेक्शन पुरवले आहे |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6=2-4 | 7=3-5 |
| **अहिल्यानगर** | | | | | | |
| 2019-20 | - | 95791 | 0 | 0 | - | 95791 |
| 2020-21 | 204453 | 82448 | 0 | 0 | 204453 | 82448 |
| 2021-22 | 90522 | 17184 | 0 | 0 | 90522 | 17184 |
| 2022-23 | 143552 | 10085 | 0 | 0 | 143552 | 10085 |
| 2023-24 | 124999 | 111228 | 255548 | 126264 | -130549 | -15036 |
| एकूण | 563526 | 316736 | 255548 | 126264 | 307978 | 190472 |
| **जळगाव** | | | | | | |
| 2019-20 | - | 10478 | 10478 | 10478 | -10478 | 0 |
| 2020-21 | 251215 | 179330 | 278213 | 278213 | -26998 | -98883 |
| 2021-22 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 2022-23 | 309 | 0 | 0 | 0 | 309 | 0 |
| 2023-24 | 10648 | 9806 | 9806 | 9806 | 842 | 0 |
| एकूण | 262172 | 199614 | 298497 | 298497 | -36325 | -98883 |
| **कोल्हापूर** | | | | | | |
| 2019-20 | - | 52356 | 653242 | 356639 | -653242 | -304283 |
| 2020-21 | 64082 | 129194 | 296603 | 131404 | -232521 | -2210 |
| 2021-22 | 102026 | 18275 | 165199 | 29860 | -63173 | -11585 |
| 2022-23 | 85924 | 42053 | 135339 | 34281 | -49415 | 7772 |
| 2023-24 | 91278 | 38362 | 101058 | 84893 | -9780 | -46531 |
| एकूण | 343310 | 280240 | 1351441 | 637077 | -1008131 | -356837 |
| **पुणे** | | | | | | |
| 2019-20 | - | 40087 | 91956 | 0 | -91956 | 40087 |
| 2020-21 | 181099 | 39559 | 0 | 76436 | 181099 | -36877 |
| 2021-22 | 187603 | 5912 | 108414 | 90132 | 79189 | -84220 |
| 2022-23 | 141691 | 13019 | 340925 | 261249 | -199234 | -248230 |
| 2023-24 | 250942 | 48332 | 0 | 0 | 250942 | 48332 |
| एकूण | 761335 | 146909 | 541295 | 427817 | 220040 | -280908 |

| वर्ष | एसडब्ल्युएसएमने दिलेली माहिती | | जिल्ह्याने दिलेली माहिती | | फरक/ न जुळणारा | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एएपीनुसार आवश्यक असलेल्या एफएचटीसींची संख्या | घरासाठी कनेक्शन पुरवले आहे | एएपीनुसार आवश्यक असलेल्या एफएचटीसींची संख्या | घरासाठी कनेक्शन पुरवले आहे | एएपीनुसार आवश्यक असलेल्या एफएचटीसींची संख्या | घरासाठी कनेक्शन पुरवले आहे |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6=2-4 | 7=3-5 |
| | | | सोलापूर | | | |
| 2019-20 | - | 1858 | - | 2359 | - | -501 |
| 2020-21 | 163683 | 97229 | 181274 | 182600 | -17591 | -85371 |
| 2021-22 | 102360 | 38091 | 75551 | 75814 | 26809 | -37723 |
| 2022-23 | 44691 | 17321 | 44547 | 42724 | 144 | -25403 |
| 2023-24 | 72622 | 29216 | 75447 | 68161 | -2825 | -38945 |
| एकूण | 383356 | 183715 | 376819 | 371658 | 6537 | -187943 |
| | | | ठाणे | | | |
| 2019-20 | - | 8450 | 0 | 0 | - | 8450 |
| 2020-21 | 144537 | 30897 | 0 | 0 | 144537 | 30897 |
| 2021-22 | 92795 | 8819 | 0 | 0 | 92795 | 8819 |
| 2022-23 | 47090 | 3984 | 0 | 0 | 47090 | 3984 |
| 2023-24 | 116406 | 22849 | 71521 | 2356 | 44885 | 20493 |
| एकूण | 400828 | 74999 | 71521 | 2356 | 329307 | 72643 |

*नोंद: **2019-20** मध्ये कोणतेही लक्ष्य निश्चित करण्यात आले नाही.*

# परिशिष्ट-VII

*(संदर्भ: परिच्छेद 4.8.1; पृष्ठ 60)*

## विमा पॉलिसी घेण्यामधील अनियमिततेचा तपशील.

| अनु क्रमांक | करार क्रमांक | कामाचे नाव | कंत्राटदाराचे नाव | कामाच्या ऑर्डरची तारीख | अंदाजित खर्च (रुपये कोटींमध्ये) | पूर्ण होण्याचा कालावधी | ज्या तारखेपर्यंत काम पूर्ण करायला हवे | शेरे/निरीक्षणे/ आढळलेल्या अनियमितता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | B-1/25/2022-23 | सिंगणापूर पाईपलाईन पाणी पुरवठा, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर | मे. जयंती सुपर कन्स्ट्रक्शन्स प्रा. लि.. | 06/10/2022 | 30.30 | 18 महिने आणि 3 महिन्यांची चाचणी | 05/06/2024 | कंपनी-विमा आधाराचे नियम (जीआयएफ - 60% आणि विमा कंपनी - 40**%**) पाळले गेले नाहीत.<br>विम्याचा संरक्षित कालावधी 25/01/2023 ते 05/07/2024 पर्यंत होता, तथापि योजना अद्याप प्रगतीपथावर असून विमा पॉलिसीचे नूतनीकरण झालेले नाही, परिणामी काम धोक्यात आले आहे. |
| 2 | B-37/2022-23 | रेट्रोफिटिंग अकोले आणि **32** गावे आरडब्ल्युएसएस, तालुका- अकोले, जिल्हा- अहिल्यानगर | मे. एस टी एम इन्फ्रा हायटेक प्रा. लि.. | 31/10/2022 | 42.34 | 18 महिने आणि 3 महिन्यांची चाचणी | 30/07/2024 | कंपनी-विमा आधाराचे नियम (जीआयएफ - 60% आणि विमा कंपनी - 40%) पाळले गेले नाहीत.<br>विम्याचा संरक्षित कालावधी 28/02/2023 ते 27/02/2024 पर्यंत होता, तथापि योजना अद्याप प्रगतीपथावर असून विमा पॉलिसीचे नूतनीकरण झालेले नाही, परिणामी काम धोक्यात आले आहे. |
| 3 | B-30/2022-23 | निमोन आणि **4** गावे आरडब्ल्युएसएस, तालुका- संगमनेर, जिल्हा- अहिल्यानगर यांचे रेट्रोफिटिंग | मेसर्स वॉटर स्टेवर्डशिप ऑर्गनायझेशन जे. व्ही. बारामती | 10/10/2022 | 9.74 | 18 महिने आणि 3 महिन्यांची चाचणी | 09/07/2024 | विम्याचा संरक्षण कालावधी 13/10/2022 ते 12/07/2024 पर्यंत होता, तथापि योजना अद्याप प्रगतीपथावर आहे आणि विमा पॉलिसीचे नूतनीकरण झालेले नाही, परिणामी काम धोक्यात आले आहे. |

| अनु क्रमांक | करार क्रमांक | कामाचे नाव | कंत्राटदाराचे नाव | कामाच्या ऑर्डरची तारीख | अंदाजित खर्च (रुपये कोटींमध्ये) | पूर्ण होण्याचा कालावधी | ज्या तारखेपर्यंत काम पूर्ण करायला हवे | शेरे/निरीक्षणे/ आढळलेल्या अनियमितता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | B-27/2022-23 | रेट्रोफिटिंग तळेगाव दिघी आरडब्ल्युएसएस, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर | मे. लक्ष्मी सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रा. लि. | 13/10/2022 | 71.39 | 18 महिने आणि 3 महिन्यांची चाचणी | 12/07/2024 | कंपनी-विमा आधारावरील नियमांचे (जीआयएफ - 60 टक्के आणि विमा कंपनी - 40 टक्के) पालन केले गेले नाही.<br>विम्याचा संरक्षित कालावधी 22/11/2022 ते 21/11/2023 पर्यंत होता, तथापि योजना अद्याप प्रगतीपथावर असून विमा पॉलिसीचे नूतनीकरण झालेले नाही, परिणामी काम धोक्यात आले आहे. |
| 5 | B-17/2022-23 | रेट्रोफिटिंग घुलेवाडी आरडब्ल्युएसएस, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर | मे. लक्ष्मी सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रा. लि. | 28/09/2022 | 72.03 | 18 महिने आणि 3 महिन्यांची चाचणी | 27/06/2024 | कंपनी-विमा तत्त्वावरील नियम (जीआयएफ - 60 टक्के आणि विमा कंपनी - 40 टक्के) पाळले गेले नाहीत. |
| **एमजेपी अहिल्यानगर** | | | | | | | | |
| 6 | B-1/08/2022-23 | भगवानगडपरिसर आणि 46 गावे आरडब्ल्युएसएस, ता. पाथर्डी, जिल्हा-अहिल्यानगर | मेसर्स विजय कन्स्ट्रक्शन्स | 29/09/2022 | 168.50 | पावसाळ्यास ह 18 महिने आणि **3** महिन्यांची चाचणी. | 28/06/2024 | कंपनी-विमा आधारावरील नियमांचे (जीआयएफ - 60 टक्के आणि विमा कंपनी - 40 टक्के) पालन केले गेले नाही. विम्याचा कालावधी 01/12/2022 ते 28/06/2024 पर्यंत होता, तथापि योजना अद्याप प्रगतीपथावर असून विमा पॉलिसीचे नूतनीकरण झालेले नाही, परिणामी काम धोक्यात आले आहे. |
| 7 | B-1/2022-23 | रेट्रोफिटिंग लोणी केडी अँड बीके आरआरडब्ल्युएसएस, ता- राहाता, जिल्हा-अहिल्यानगर | मे. पी. एल. अडके | 15/11/2022 | 53.48 | पावसाळ्यास ह 18 महिने आणि **3** महिन्यांची चाचणी. | 14/08/2024 | कंपनी-विमा आधाराचे नियम (जीआयएफ - 60% आणि विमा कंपनी - 40%) पाळले गेले नाहीत.<br>विम्याचा संरक्षित कालावधी 27/01/2023 ते 14/08/2024 पर्यंत होता, तथापि योजना अद्याप प्रगतीपथावर असून विमा पॉलिसीचे नूतनीकरण झालेले नाही, परिणामी काम धोक्यात आले आहे. |

# परिशिष्ट-VIII

*(संदर्भ: परिच्छेद 4.8.2; पृष्ठ 61)*

## अतिरिक्त कामगिरी सुरक्षा आणि सुरक्षा ठेवीपोटी ₹ 0.55 कोटींची कमी रक्कम प्राप्त झाली

| अनु क्रमांक | कामाचे नाव | कंत्राटदारांचे नाव | बोली/अंदाजित खर्च (रक्कम रुपयांमध्ये) | निविदेसाठी टक्केवारीचा दर 10 टक्क्यांपेक्षा कमी | प्रारंभिक सुरक्षा ठेव म्हणजेच अंदाजित खर्चाच्या दोन टक्के रक्कम बॅकलॉग म्हणून घ्यावी (रक्कम रुपयांमध्ये) (अ) | अतिरिक्त कामगिरी सुरक्षा म्हणून बॅकलॉग गॅरंटी घेण्यात येईल (रक्कम रुपयांमध्ये) (ब) | एकूण घ्यावयाची सुरक्षा ठेव (रक्कम रुपयांमध्ये) (अ + ब) | कंत्राटदाराने सादर केलेली रकमेची बँक गॅरंटी/डीडी (रक्कम रुपयांमध्ये) | कंत्राटदाराने सादर केलेली कमी रकमेची बँक गॅरंटी / डीडी (रक्कम रुपयांमध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | जाटेगाव पीडब्ल्युएस, ब्लॉक-जामखेड | श्री अरुण लक्ष्मण जगताप | 10957598 | 18.16 *टक्के* कमी | @2 *टक्के* = 219152 | @12 *टक्के* = 1314912 | 1534064 | 437000 | 1097064 |
| 2 | डघुल, श्रीगोंडा, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्रीगोंडा ब्लॉक येथील रेट्रोफिटिंग | श्री गोविंद जयसिंग जगताप | 28853449 | 17.10 *टक्के* कमी | @2 *टक्के* = 577069 | @10 *टक्के* = 2885345 | 3462414 | 1154200 | 2308214 |
| 3 | कोरेगाव पीडब्ल्युएस, ब्लॉक- कर्जत येथे रेट्रोफिटिंग | शिवराज एंटरप्रायझेस | 36281112 | 18.50 ***टक्के*** कमी | @2 *टक्के* = 725622 | @12 *टक्के* = 4353733 | 5079355 | 2994346 | 2085009 |
| | **एकूण** | | | | | | **10075833** | **4585546** | **5490287** |

## संक्षिप्त शब्दावली

| संक्षेप | पूर्ण रुप |
|---|---|
| एपीएस | अतिरिक्त कामगीरी सुरक्षा ठेव |
| एएपी | वार्षिक कृती आराखडा |
| एएसए | लेख्यांचे लेखापरीक्षित विवरण |
| बीएमसी | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| सीएसएस | केंद्र पुरस्कृत योजना |
| सीईओ | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| डीएपी | जिल्हा कृती आराखडा |
| डीएमए | जिल्हा मीटरिंग क्षेत्रे |
| डीडब्ल्युएसएम | जिल्हा पाणी आणि स्वच्छता अभियान |
| ईसी | इलेक्ट्रो-क्लोरीनेटर्स |
| ईएसआर | उन्नत सेवा जलाशय |
| कार्य.अभि. | कार्यकारी अभियंता |
| एफटीके | फील्ड टेस्टिंग किट |
| एफएचटीसी | कार्यशील घरगुती नळ जोडणी |
| भारत सरकार | भारत सरकार |
| महाराष्ट्र शासन | महाराष्ट्र शासन |
| जीआर | शासन निर्णय |
| ग्रा.प. | ग्रामपंचायत |
| जीएसडीए | भूजल सर्वेक्षण आणि विकास एजन्सी |
| एचजीजे | हर घर जल |
| आयए | अंमलबजावणी संस्था |
| आयएसए | अंमलबजावणी समर्थन संस्था |
| आयएमआयएस | एकात्मिक व्यवस्थापन माहिती प्रणाली |
| आयओटी | इंटरनेट आफ थिंग्स |
| जेजेएम | जल जीवन मिशन |
| एलपीसीडी | दरडोई दररोज लिटर |
| एमआयडीसी | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ |
| एमजेपी | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |
| एमव्हीएस | बहु ग्राम योजना |
| एनएबीएल | चाचणी आणि मापांकन प्रयोगशाळांसाठी राष्ट्रीय मान्यता मंडळ |
| एनआरडीडब्ल्यूपी | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम |
| ओ&एम | संचालन आणि देखभाल |
| पीआरआय | पंचायत राज संस्था |

| संक्षेप | पूर्ण रुप |
|---|---|
| पीएफएमएस | सार्वजनिक वित्त व्यवस्थापन प्रणाली |
| आरडीपीडी | ग्रामीण विकास आणि पंचायत राज विभाग |
| आरडब्ल्यूएसडी | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग |
| एसएनए | एकल नोडल खाते |
| एसव्हीएस | एकल ग्राम योजना |
| एसएपी | राज्य कृती आराखडा |
| एसएलएसएससी | राज्यस्तरीय योजना मंजुरी समिती |
| एसडब्ल्युएसएम | राज्य पाणी आणि स्वच्छता अभियान |
| स्काडा | पर्यवेक्षकीय नियंत्रण आणि डेटा प्रवेश |
| एसबीएम | स्वच्छ भारत अभियान |
| टीएस | तांत्रिक मंजुरी |
| बीएलएस | पायाभुत सर्वेक्षण |
| युसी | उपयोगीता प्रमाणपत्र |
| व्हीएपी | ग्राम कृती आराखडा |
| व्हीडब्ल्युएससी | ग्राम पाणी आणि स्वच्छता समिती |
| डब्ल्युक्यूएमआयएस | पाणी गुणवत्ता व्यवस्थापन माहिती प्रणाली |
| डब्ल्युक्यूएमएस | पाणी गुणवत्ता सनियंत्रण आणि देखरेख |
| डब्ल्युएसएसडी | पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग |
| डब्ल्युएसएस | पाणी पुरवठा योजना |
| डब्ल्युटीपी | जल शुद्धीकरण प्रकल्प |
| डब्ल्युओ | कार्यारंभ आदेश |
| झेडपी | जिल्हा परिषद |

https://cag.gov.in/ag/nagpur/en

SUPREME AUDIT INSTITUTION OF INDIA
लोकहितार्थ सत्यनिष्ठा
Dedicated to Truth in Public Interest

# Report of the Comptroller and Auditor General of India Performance Audit on Jal Jeevan Mission for the period ended March 2024

## Government of Maharashtra

**Report No. 2 of 2026**

**(Performance Audit – Civil)**

# Report of the
# Comptroller and Auditor General of India
# Performance Audit on Jal Jeevan Mission
# for the period ended March 2024

## Government of Maharashtra
**Report No. 2 of 2026**
**(Performance Audit – Civil)**

# TABLE OF CONTENTS

# PREFACE

This Report of the Comptroller and Auditor General of India has been prepared for submission to the Governor of Maharashtra under Article 151 of the Constitution of India.

The Report contains the results of Performance Audit on 'Jal Jeevan Mission' covering the period April 2019 to March 2024. The audit has been carried out as per the provisions of the Comptroller and Auditor General's (Duties, Powers and Conditions of Service) Act, 1971 and Regulations on Audit and Accounts, 2007 (Amended in 2020) issued thereunder by the Comptroller and Auditor General of India.

The Performance Audit has been conducted in conformity with the Auditing Standards issued by the Comptroller and Auditor General of India.

## WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT

### Performance Audit on Jal Jeevan Mission

### AUDIT SNAPSHOT

| Why did we do this audit? | What did we find? |
|---|---|
